दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १२७) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.१४ मे २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## केंद्र सरकारची सोन्या-चांदीवरील आयात शुल्कात जबर वाढ

नवी दिल्ली दि.१३ (वृत्तसंस्था)- केंद्र सरकारने सोन्या-चांदीवरील आयात शुल्कात मोठी वाढ केल्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेत या मौल्यवान धातूंच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे.सरकारने सोन्या आणि चांदीवरील एकूण आयात शुल्क ६ वरून वाढवून १५ टक्के केलं आहे. यामध्ये १० टक्के मूलभूत सीमा शुल्क आणि ५ टक्के कृषी पायाभूत सुविधा आणि विकास उपकर यांचा समावेश आहे. आयात शुल्क वाढीच्या बातमीमुळे कल्याण ज्वेलर्स आणि टायटन सारख्या ज्वेलरी कंपन्यांच्या शेअर्समध्ये ६ टक्क्यांपर्यंत घसरण पाहायला मिळाली. हे बदल मध्यरात्रीपासून लागू करण्यात आले असून, यामुळे आगामी काळात सोन्या-चांदीच्या मागणीवर आणि किमतींवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

या निर्णयामुळे मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर चांदीच्या जुलै २०२६ च्या फ्युचर्समध्ये प्रति किलो १६,७४३ रुपयांची वाढ होऊन ती २,९५,८०५ रुपयांवर पोहोचली. सोन्याच्या जून २०२६ च्या फ्युचर्समध्ये प्रति १० ग्रॅम ९,२०६ रुपयांची (६ टक्के) वाढ होऊन किंमत १,६२,६४८ रुपये झाली. दुसरीकडे, अमेरिकेतील ग्राहक महागाई एप्रिलमध्ये वेगाने वाढल्यामुळे, फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर कपातीची अपेक्षा कमी झाली आहे, ज्याचा परिणाम जागतिक बाजारपेठेतील वातावरणावर झाला आहे.

बाजारात सध्या प्रचंड अस्थिरता आहे. त्यामुळे तज्ज्ञांच्या मते, ज्या गुंतवणूकदारांनी आधीच खरेदी केली आहे, त्यांनी ठराविक टप्प्यावर नफा वसुली करणे फायद्याचे ठरू शकते.

# नीट पेपर लीक प्रकरण :नाशिक, पुणे, अहिल्यानगर मधून तिघांना अटक!

पुणे दि.१३ (प्रतिनिधी)- नीट पेपर फुटी प्रकरणात महाराष्ट्र कनेक्शन उघडकीस आल्यानंतर महाराष्ट्र पोलिसांनी नाशिक, पुणे आणि अहिल्यानगर मधून तिघांना अटक केली आहे. यात ब्युटी पार्लर चालवणाऱ्या पुण्यातील एका महिलेचा समावेश आहे. तसेच पोलिसांनी लातूर येथील एका क्लास चालकाची देखील चौकशी सुरु केली आहे. या क्लास चालकाने मॉक टेस्ट मध्ये घेतलेल्या प्रश्नापैकी ४२ प्रश्न नीट परीक्षेत आल्याने या क्लास चालकाची चौकशी करण्यात येतं आहे.

नीट पेपरफुटी प्रकारणाचे महाराष्ट्र कनेक्शन उघडकीस आल्यानंतर नाशिक पोलिसांनी शुभम खैरनार याला ताब्यात घेतले, त्यानंतर अहिल्यानगर येथून लोखंडे याला आणि पुणे येथून ब्युटी पार्लर चालवणाऱ्या महिलेला अटक केली आहे.

पुणे पोलिसांनी याप्रकरणी धडक कारवाई करत मनीषा वाघमारे या ४६ वर्षीय महिलेला ताब्यात घेतले आहे. अहिल्यानगर (अहमदनगर) येथील मुख्य संशयित आरोपीला या महिलेनेच या बेकायदेशीर कामात मोठी रसद पुरवल्याचा पोलिसांचा भक्कम संशय आहे.

प्राथमिक तपासात अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे की, मनीषा वाघमारे हिचे पुण्यात ब्युटी पार्लर होते, मात्र हे केवळ एक दिखाव्यापुरते साधन होते. प्रत्यक्षात या पार्लरच्या पडद्याआडून वैद्यकीय प्रवेशाचे आणि पेपरफुटीचे एक मोठे व सुनियोजित रॅकेट चालवले जात असल्याचा पोलिसांचा कयास आहे. पैशांच्या आमिषाने गरजू विद्यार्थ्यांना जाळ्यात ओढणे आणि त्यांना मुख्य आरोपींपर्यंत पोहोचवणारी 'मध्यस्थ' म्हणून ही महिला काम करत असल्याचा गंभीर आरोप तिच्यावर ठेवण्यात आला आहे.

पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात मनीषा हिचा मोबाईल फोन, लॅपटॉप आणि इतर महत्त्वाची इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त करण्यात आली आहेत. या उपकरणांच्या तांत्रिक तपासणीतून अनेक खळबळजनक बाबी उघडकीस आल्या आहेत. अहिल्यानगर येथून नुकतेच अटक करण्यात आलेला संशयित धनंजय लोखंडे आणि मनीषा यांच्यात सातत्याने संपर्क असल्याचे निष्पन्न झाले आहे. दोघांमधील व्हॉट्सअॅप चॅट्स आणि कॉल रेकॉर्ड्स पोलिसांच्या हाती लागले असून, हा घोटाळा उघडकीस आल्यानंतरही ते दोघे सतत एकमेकांच्या संपर्कात राहून माहितीची देवाणघेवाण करत असल्याचे तपासात उघड झाले आहे.

बिबवेवाडीतून ताब्यात घेतल्यानंतर पुणे पोलिसांनी या संशयित महिलेची सलग अडीच ते तीन तास सखोल चौकशी केली. या चौकशीदरम्यान, वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये बेकायदेशीर प्रवेश मिळवून देण्यापासून ते विद्यार्थ्यांपर्यंत फुटलेले पेपर पोहोचवण्याच्या संपूर्ण साखळीत तिचा सक्रिय सहभाग असल्याचे स्पष्ट संकेत पोलिसांना मिळाले आहेत. या प्रकरणाची व्याप्ती आणि गांभीर्य पाहता, अधिक सखोल व देशव्यापी तपासासाठी या महिलेला आज संध्याकाळपर्यंत केंद्रीय अन्वेषण विभागाच्या ताब्यात दिले जाण्याची दाट शक्यता सूत्रांकडून वर्तवली जात आहे.

१२ मे रोजी एका विद्यार्थिनीच्या पालकांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात लेखी तक्रार दिली की, लातूरमधील एका शिकवणी वर्गाने परीक्षेपूर्वी दिलेल्या सराव चाचणीमधील तब्बल ४२ प्रश्न नीट परीक्षेत जशास तसे आले होते. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्याकडे चौकशी सोपवली आहे.

### शुभम खैरनार सीबीआयच्या ताब्यात

दरम्यान, नीट पेपर फुटी प्रकरणातील नाशिकमधील संशयित शुभम खैरनारला घेऊन सीबीआय टीम मध्यरात्री मुंबईकडे रवाना झाली आहे. सीबीआयने शुभम खैरनारचा नाशिक पोलिसांकडून ताबा घेतलाय. सीबीआयकडून शुभम खैरनारची रात्री उशिरापर्यंत प्राथमिक चौकशी करण्यात आली. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार नाशिकचा शुभम आणि पुण्याचा रहिवासी धनंजय यांनी हे पेपर लीक करण्याचा कट रचला होता. धनंजयने कथितरित्या नीटचा पेपर शुभमला १० लाख रुपयांना विकला असल्याची माहिती आहे. त्यानंतर शुभमने टेलिग्रामद्वारे तो पेपर १५ लाख रुपयांना विकल्याचा आरोप आहे. याप्रकरणी, सीबीआयने कारवाई सुरू केली असून नाशिक, पुणेसह हरियाण, राजस्थान, तेलंगणातही चौकशी केली जात आहे.

# अमेरिकेच्या आर्थिक स्थितीचा मी विचार करत नाही; डोनाल्ड ट्रम्प यांच्या वक्तव्याची चर्चा



वॉशिंग्टन दि.१३ (वृत्तसंस्था)- अमेरिका-इराणमध्ये २८ फेब्रुवारी २०२६ रोजी युद्ध सुरू झालं होतं. या युद्धाला आता जवळपास दीड महिन्यांचा कालावधी होऊन गेला आहे. मात्र, अद्यापही हे युद्ध पूर्णपणे संपलेलं नाही. दोन्ही देशांत युद्धविरामाची घोषणा करण्यात आलेली असली तरी युद्ध संपलेलं नाही. इराणला काही दिवसांत गुडघ्यावर आणण्याची भाषा करणाऱ्या अमेरिकेला हे युद्ध चांगलंच भारी पडल्याचं बोललं जात आहे.

या युद्धामुळे जगातील अनेक देशांत इंधनाच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. ११ आणि १२ एप्रिल रोजी अमेरिका-इराणमध्ये पाकिस्तानच्या मध्यस्थीने इस्लामाबादमध्ये शांतता चर्चा झाली, पण शांतता चर्चा निष्फळ ठरली. या चर्चेत अमेरिका-इराण आपापल्या मुद्द्यांवर ठाम राहिल्याने युद्ध संपवण्याबाबत कोणताही तोडगा निघू शकला नाही. त्यामुळे युद्ध संपणार की नाही? किंवा हे युद्ध नेमकं कधी संपणार? याबाबत संभ्रम कायम आहे.

यातच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे सातत्याने वेगवेगळी वक्तव्य करत इराणला धमकीवजा इशारा देत असल्याने दोन्ही देशांतील तणावाची परिस्थिती आणखी वाढण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. आता डोनाल्ड ट्रम्प यांनी आज केलेल्या एका वक्तव्याची मोठी चर्चा सुरू आहे. अमेरिकेच्या 'आर्थिक परिस्थिती'पेक्षा इराणला अण्वस्त्रांपासून रोखणं अधिक महत्त्वाचं असून मी अमेरिकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करत नाही, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

अमेरिका-इराण युद्ध संपवण्यासाठी सुरू असलेल्या वाटाघाटींच्या अनुषंगाने एका पत्रकाराने प्रश्न विचारला की, अमेरिकेच्या नागरिकांची आर्थिक परिस्थिती तुम्हाला करार करण्यासाठी कितपत भाग पाडत आहे? यावर ट्रम्प यांनी उत्तर दिलं की, "अगदी किंचितही नाही."

"जेव्हा मी इराणबद्दल बोलतो, तेव्हा एकच गोष्ट महत्त्वाची असते, ती म्हणजे त्यांच्याकडे अण्वस्त्रे असू नये. मी अमेरिकेच्या नागरिकांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करत नाही. मी कोणाचाही विचार करत नाही. मी फक्त एकाच गोष्टीचा विचार करतो. आपण इराणला अण्वस्त्रे मिळवून देऊ शकत नाही. बस्स एवढंच", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

# इराणने विस्तारली समुद्री सीमा; ट्रम्प-जिनपिंग भेटीपूर्वीच मोठी खेळी

तेहरान दि.१३ (वृत्तसंस्था)- अमेरिका आणि चीन यांच्यात होणाऱ्या महत्त्वाच्या शिखर परिषदेपूर्वी इराणने जागतिक राजकारणात मोठी खळबळ उडवून दिली आहे. जगातील खनिज तेलाच्या वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' या समुद्री मार्गाची व्याख्या इराणने अचानक विस्तारली आहे. यामुळे आता आंतरराष्ट्रीय समुदायाने आजवर मान्य केलेल्या क्षेत्रापेक्षा इराणचा प्रभाव मोठ्या क्षेत्रावर पसरणार असून, यामुळे जागतिक तेल संकट अधिक गडद होण्याची भीती निर्माण झाली आहे.

इराणच्या 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स'चे अधिकारी मोहम्मद अकबरजादे यांनी ही घोषणा केली. ते म्हणाले की, "यापूर्वी हॉर्मुझची सामुद्रधुनी ही केवळ काही बेटांपुरती मर्यादित होती. मात्र, आता इराणने याचे क्षेत्र विस्तारले असून ते शेकडो मैल लांब असेल."

इराणच्या या नव्या दाव्यानुसार, आता ही सामुद्रधुनी आग्नेय इराणमधील 'जास्क' किनाऱ्यापासून सुरू होईल. विशेष म्हणजे, 'जास्क' हे ठिकाण पर्शियन आखाताच्या बाहेर ओमानच्या उपसागरात येते. याचा अर्थ असा की, इराणने आता आपला प्रभाव क्षेत्राचा विस्तार थेट मोकळ्या समुद्रापर्यंत नेला आहे. "इराण आपल्या समुद्री हद्दीत कोणताही हस्तक्षेप खपवून घेणार नाही," असा इशाराही त्यांनी दिला आहे.

जगातील एकूण खनिज तेल व्यापारापैकी सुमारे २०% व्यापार याच अरुंद मार्गातून होतो. अमेरिका आणि इस्त्रायलसोबत सुरू असलेल्या संघर्षामुळे हा मार्ग आधीच विस्कळीत झाला आहे. त्यामुळे आशिया आणि युरोपमध्ये इंधनाचे दर गगनाला भिडले आहेत. चीन आपल्या गरजेच्या १२% तेल इराणकडून घेतो. इराणच्या या पावलामुळे चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

# नरेंद्र मोदींचा कृतीतून संदेश!, पंतप्रधानांच्या ताफ्यात फक्त दोन कार

नवी दिल्ली दि.१३ (वृत्तसंस्था)- जागतिक स्तरावर निर्माण झालेले ऊर्जा संकट आणि इंधनाच्या वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. पंतप्रधानांनी देशवासीयांना इंधन बचतीचे आवाहन केल्यानंतर स्वतःच्या ताफ्यातील वाहनांची संख्या लक्षणीयरीत्या कमी केली आहे. बुधवारी पंतप्रधान मोदी केवळ दोन गाड्यांच्या ताफ्यासह कॅबिनेटच्या बैठकीला पोहोचले. इंधन बचतीचे आवाहन केल्यानंतर पंतप्रधान मोदींनी हे पाऊल उचलले जेणेकरून इतरांनाही याचे अनुकरण करण्याची प्रेरणा मिळेल.

पंतप्रधानांच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या विशेष सुरक्षा दलाच्या प्रोटोकॉलमध्ये कोणतीही तडजोड न करता हा महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला. नवीन व्यवस्थेनुसार, आता केवळ अत्यंत आवश्यक असलेली सुरक्षा वाहनेच ताफ्यात असतील. एका गाडीत पंतप्रधान स्वतः होते, तर दुसऱ्या गाडीत एसपीजीचे कमांडो तैनात होते. अनावश्यक गाड्या हटवून ताफा अधिक सक्षम बनवण्यावर पंतप्रधानांनी भर दिला आहे. तसेच, भविष्यात ताफ्यात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवण्याचे सूतोवाचही त्यांनी केले आहे.

पंतप्रधानांव्यतिरिक्त, इतर मंत्री आणि नेत्यांनीही त्यांच्या ताफ्यातील (पान ४ वर)

# पेट्रोल डिझेलच्या दरात वाढ होण्याची शक्यता, पेट्रोलियम मंत्र्यानंतर आरबीआयचे गव्हर्नर संजय म्हलोत्रा यांचे सूचक वक्तव्य

नवी दिल्ली दि.१३ (वृत्तसंस्था)- अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धामुळं निर्माण झालेल्या स्थितीमुळं कच्चा तेलाच्या दरात मोठी वाढ होत आहे. यामुळं भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ होऊ शकते. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षाची स्थिती दीर्घकाळ चालू राहिली तर भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे. आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी याबाबत संकेत दिले आहेत. केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी दरवाढीसंदर्भात सूचक वक्तव्य केलं आहे.

संजय म्हलोत्रा स्वित्झरलँडमध्ये स्विस नॅशनल बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून आयोजित परिषदेसाठी पोहोचले होते. या दरम्यान ते म्हणाले की जर अशीच स्थिती दीर्घकाळासाठी सुरु राहिली तर सरकाला वाढलेल्या दरांचा काही भार ग्राहकांवर टाकावा लागेल. ते म्हणाले की संघर्षाची स्थिती कायम असल्यानं उत्पादन शुल्क कमी करण्यात आलं आहे. तर, सरकारी इंधनाचे रिटेल विक्रेते कच्चा तेलाच्या दरात झालेल्या वाढीचा सामना करत आहेत, असं त्यांनी म्हटलं.

पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या वक्तव्यानंतर आरबीआयचे गव्हर्नर संजय म्हलोत्रा यांनी देखील पश्चिम आशियात संघर्ष दीर्घकाळ सुरु राहिल्यास, जागतिक बाजारात वाढत असलेल्या तेलाच्या दरांचा विचार करता भारतात पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढवावे लागू शकतात, असं म्हटलं. ऊर्जा साधनांच्या दरात वाढ झाल्यानं महागाईवर नियंत्रण मिळवणं अवघड होत आहे, त्यासाठी आरबीआयला प्रयत्न करतावे लागत आहेत. आरबीआयची पुढील बैठक ५ जूनला होणार आहे.

# इंधन बचतीसाठी ताफा कमी करण्याची राज्यपालांची सूचना

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार पेट्रोल व डिझेलचा वापर कमी करण्याच्या आणि मर्यादित संसाधनांच्या कार्यक्षम वापरास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करण्याच्या दृष्टीने सूचना केल्या आहेत.

राज्यपालांनी राज्य शासनाच्या गृह विभागाला विद्यमान सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेऊन त्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करण्याची शक्यता तपासण्याचे निर्देश दिले आहेत.

गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांना पाठविलेल्या पत्रात राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी राज्यपालांच्या सुरक्षेचा आढावा घेऊन ऊर्जा बचतीच्या अनुषंगाने वाहनांची संख्या निर्धारित करण्याच्या राज्यपालांच्या सूचना कळवल्या आहेत. मर्यादित संसाधनांचा जबाबदारीने वापर करण्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राज्यपालांनी सदर सूचना केल्या आहेत.

# अशोक खरातप्रकरणात शिवनिका संस्थानचे माजी सचिव आणि जगदंबा माता पतसंस्था संचालक नामकर्ण आवारेला अटक

नाशिक दि.१३ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील महिला लैंगिक प्रकरणातील आरोपी भोंदू अशोक खरात प्रकरणात एसआयटी पोलिसांकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. गेल्याच आठवड्यात एसआयटीने महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची चौकशी केली होती, तब्बल ६ तास त्यांच्याकडून घटनेची माहिती घेत तपास केला होता. त्यानंतर आता भोंदू खरातच्या प्रकरणात सिन्नर पोलिसांनी शिवनिका संस्थानचे माजी सचिव आणि जगदंबा माता पतसंस्था संचालक नामकर्ण आवारेला अटक केली आहे.

सिन्नर पोलिसांनी नामकर्ण आवारेला अटक केली असून आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात ही अटक झाल्याची माहिती आहे. सिन्नरच्या जगदंबा माता पतसंस्थेत खरातने उघडलेल्या ३२ खात्यांना आवारे याची सहमती असल्याचे तपासात निष्पन्न झाल्यानंतर ही कारवाई वेगाने करण्यात आली. खरातच्या कबुलीनंतर सिन्नर पोलिसांनी नामकर्ण आवारेला अटक केली.

अशोक खरात ला कालच सिन्नर पोलिसांनी अटक करून आज कोर्टात हजर केले होते, अशोक खरातच्या चौकशीत नामकर्ण आवारेचे नाव पुढे आल्यानं त्यास अटक करण्यात आली. नामकर्ण आवारे सिन्नर तालुका औद्योगिक वसाहतीचा चेअरमन आणि जगदंबा माता पतसंस्था कुंदेवाडीचा संस्थापक आहे. नामकर्ण आवारे याने असा मी नामकर्ण या पुस्तकात अशोक खरातची स्तुती करणारे प्रकरण लिहिल्याने आवारे चर्चेत आला होता.

अशोक खरातला आज सिन्नर येथील न्यायालयात हजर करण्यात आले होते, न्यायालयाने सिन्नर पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात १८ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. आज अशोक खरातला सिन्नर प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालयात हजर केले होते. जगदंबा पतसंस्थेतील फेक अकाउंट आणि आर्थिक व्यवहारप्रकरणी अशोक खरातवर गुन्हा दाखल आहे. जगदंबा पतसंस्थेत ३२ बनावट खाते उघडल्याने पोलिसांनी अशोक खरातच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती. या प्रकरणात आर्थिक सोर्स कोणता याचा पोलिसांना तपास करायचा आहे, त्यामुळे आणखी पोलीस कोठडी वाढवून मागण्यात आली.

# किशोरी पेडणेकरांनी १०० कोटींचा घोटाळा केला; भाजपच्या किरीट सोमय्या यांचा आरोप

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या किशोरी पेडणेकर यांनी तब्बल १०० कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप भाजप नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केला आहे. किशोरी पेडणेकर यांनी २०२१ मध्ये मुलुंड नाट्यगृह संकल्प व अंधेरी संकुल हे १५ वर्षांसाठी भाड्याने देऊन जवळपास १०० कोटींचा घोटाळा केला, असे ते म्हणालेत. त्यांच्या या आरोपामुळे किशोरी पेडणेकरांच्या अडचणींत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.

किरीट सोमय्या यांनी आज सकाळी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकरांवर उपरोक्त आरोप केले. ते म्हणाले, किशोरी पेडणेकर यांनी मुलुंडचे कालिदास नाट्यगृह संकल्प व अंधेरी येथील शहाजीराजे संकुल १५ वर्षांसाठी एका प्रायव्हेट डेकोरेटरला भाड्याने दिली. त्यातून त्यांनी १०० कोटींचा घोटाळा केला आहे. या कलाक्रीडा संकुलाची जमीन महापालिकेची आहे. १९८९ मध्ये ललित कला प्रतिष्ठान या ट्रस्टची स्थापना करण्यात आली. मुंबईकरांसाठी पूर्व उपनगरासाठी (पान ४ वर)

# मिस्टर राहुल, प्रियांका गांधी वायनाड विसरा, तुम्ही पुन्हा विजयी होणार नाही

## सत्तास्थापनेचा तिढा; केरळमध्ये झळकले पोस्टर्स

नवी दिल्ली दि.१३ (वृत्तसंस्था)- कोण होणार केरळचा नवा मुख्यमंत्री? दहा दिवसानंतर देखील या चर्चांना काही केल्या पूर्णविराम मिळताना दिसत नाही. मुख्यमंत्री निवडीवरुन काँग्रेसच्या सुरु असलेल्या बैठकांमधून ठोस निर्णय होत नसल्याने पक्षातील नेत्यांसह राज्यातील नागरिकांनी आता संताप व्यक्त करण्यास सुरुवात केलीय. एवढेच नव्हे तर राहुल गांधींच्या वायनाड मतदारसंघात देखील धुसफूस सुरु झाली असून, गांधींना इशारा देणारे पोस्टर शहरात झळकू लागले आहेत.

"मिस्टर राहुल आणि प्रियांका, वायनाड विसरा. तुम्ही पुन्हा येथून विजयी होणार नाही", असा संदेश देणारे एक पोस्टर वायनाडमध्ये जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यालयाबाहेर झळकले आहे. याशिवाय आणखी काही पोस्टर समोर आली असून, यात गांधींना इशाराच देण्यात आला आहे. "मिस्टर राहुल, के. सी कदाचित तुमच्या बॅगा उचलत असतील पण, केरळची जनता तुम्हाला माफ करणार नाही", अशा स्पष्ट संदेश लिहलेले आणखी एक पोस्टर इथं झळकले आहे. दुसऱ्या एका पोस्टरवर "आरजी, पीजी हा इशारा नाही. या चुकीसाठी केरळ तुम्हाला माफ करणार नाही", असा संदेश लिहण्यात आला आहे.

केरळमध्ये काँग्रेस आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. पण, राज्यातील सत्ता स्थापनेचा तिढा अद्याप सुटलेला नाही. यावरुन नागरिकांमध्ये नाराजी असल्याचे दिसून येते. राहुल गांधी यांना २०१९ मध्ये अमेठी मतदारसंघातून पराभव पत्करावा लागला होता. एक पोस्टरमध्ये राहुल गांधी यांना २०१९ ची आठवण करुन देताना "वायनाड पुढची अमेठी" असू शकते असा इशारा देण्यात आला आहे. तसेच, "केरळ राहुल आणि प्रियांका गांधी यांचे मूर्खपणाचे निर्णय मान्य करणार नाही", असाही संदेश लिहण्यात आला आहे.

# भोंदू खरातशी संबंध नाही म्हणणाऱ्या चाकणकर ३ दिवस गुवाहाटीमध्ये सोबत; हॉटेलचे डिटेल्स समोर

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- अशोक खरात याचे उद्योग समोर आल्यानंतर आपला काहीही संबंध नाही, असे दाखविणाऱ्या महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर चांगल्याच अडकल्या आहेत. महाराष्ट्रातील सत्तांतरावेळी जे गुवाहाटी चर्चेत आले, त्याच गुवाहाटीला अशोक खरात याच्यासोबत रुपाली चाकणकर यांनी दौरा केला. विशेष म्हणजे रुपाली चाकणकर यांच्या भगिनी प्रतिभा चाकणकर या देखील त्यांच्या दौऱ्यात सहभागी होत्या. गुवाहाटीच्या हॉटेल ब्लू रॅडिसन येथे तिघांनीही तीन दिवस मुक्काम केला. अधोरेखित करण्यासारखी बाब म्हणजे खरात प्रकरणातच आर्थिक अफरातफरीचा आरोप ठेवून चाकणकर यांना ईडीने उद्या (गुरूवारी) चौकशीसाठी बोलविले आहे. त्याआधी त्यांचा खरातसोबत गुवाहाटी दौरा समोर आल्याने चाकणकर चहूबाजूंनी अडकल्याचे बोलले जाते.

अशोक खरात याच्या नाशिकच्या मिरगावातील काळ्या कृत्यांनी संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला. श्रीमंत भक्तांना भुलवून त्यांच्याकडून लाखो रूपये उकळून, शेकडो महिलांचे लैंगिक शोषण करण्याचा कारनामे त्याने केले. त्याच्याच कार्यालयात काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याने हा संपूर्ण प्रकार उघडकीस आणला. याच प्रकरणात खरात सोबत असलेल्या जवळीकतेमुळे चाकणकर यांना राजीनामा द्यावा लागला. खरातसोबत (पान ४ वर)

# पंतप्रधानांच्या आवाहनाची थट्टा नको; मुख्यमंत्री फडणवीस अॅक्शन मोडवर

## मंत्र्यांचा ताफा कमी करण्यासह त्यांच्या विदेश दौऱ्यावर निर्बंध

नाशिक दि.१३ (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परकीय चलन वाचविण्यासाठी पेट्रोल-डिझेल, खाद्यतेल, सोने खरेदीवर काटकसर करण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनाला महाराष्ट्र सरकारने सकारात्मक पद्धतीने घेतले असून, मंत्र्यांच्या ताफा कमी करण्यासह त्यांच्या विदेश दौऱ्यावर निर्बंध घातल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. तसेच, विरोधकांना या उपाययोजनांचे पालन करायचे नसेल तर किमान त्यांनी याबाबत थट्टा-मस्करी करु नये, असे फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे 'नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्ह अनावरण केले. या कार्यक्रमानंतर फडणवीसांनी माध्यमांशी संवाद साधला. "सध्या वैश्विक संकटाची परिस्थिती निर्माण झाली आहे, त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनाला सकारात्मक पद्धतीने घ्यायला हवं. अनेक देशांमध्ये परिस्थिती चिंताजनक आहे. काही ठिकाणी लॉकडाऊनसारखी स्थिती आहे, पेट्रोल महाग झालंय, ३-४ दिवस इंधन मिळत नाहीये. अशा संकटाच्या काळात आर्थव्यवस्था रुळावर ठेवण्यासाठी पंतप्रधान काही उपाय सुचवत असतील तर त्याला गांभीर्याने घ्यायला हवं. आणि विरोधकांना त्यावर अंमल करायचा नसेल तर किमान त्यांनी चेष्टा तरी करु नये", असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

"महागाई वाढू नये यासाठी नरेंद्र मोदी यांनी ज्या उपाययोजना सांगितल्या आहेत त्या प्रत्येकाने थोड्या थोड्या प्रमाणात का होईना जीवनशैलीत बदल केल्यास देशाला मदत होऊ शकते. मोदींनी सहा महिन्यांसाठी केलेल्या या आवाहनाला देशातील जनता सहकार्य करेल", असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

# ताजे निकाल आणि उद्याचे राजकारण

केरळ आणि पश्चिम बंगालमधील संभाव्य सत्तापालट केवळ राज्यांपुरता मर्यादित नसून भारतीय राजकारणात राष्ट्रवाद आणि थेट विकासाच्या मुद्द्यांसह नवीन ध्रुवीकरणाचे संकेत देतो. भाजपला पोषक ठरणाऱ्या वातावरणाची निर्मिती देशभर होणे, आगामी उत्तर प्रदेश विधानसभा आणि २०२९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी रणनीती ठरवणारी नवी बाब ठरेल. त्यामुळे राष्ट्रीय राजकारणाची समीकरणे पूर्णपणे बदलू शकतात.

भारतीय लोकशाहीच्या पटलावर केरळ आणि पश्चिम बंगाल ही दोन राज्ये नेहमीच वैचारिक लढाईची केंद्रे राहिली आहेत. डाव्यांचा बालेकिल्ला आणि तृणमूलची पकड असलेल्या या राज्यांमध्ये सत्तेचे वारे बदलतात, तेव्हा त्याची कंपने दिल्लीपर्यंत जाणवतात. सत्ता परिवर्तन हे केवळ सत्ताधाऱ्यांचे अपयश नसते, तर मतदारांच्या बदललेल्या आकांक्षांचा हुंकार असतो. पश्चिम बंगालमधील राजकीय हिंसाचार आणि केरळमधील बदलती लोकसंख्याशास्त्रीय समीकरणे यांच्या पार्श्वभूमीवर होणारे सत्तांतर हे भारतीय राजकारणाच्या पूर्वेकडून दक्षिणेकडे जाणाऱ्या नव्या प्रवाहाचे प्रतीक आहे. हे निकाल केवळ राज्यांचे भवितव्य ठरवणार नाहीत, तर देशाच्या संघराज्य रचनेवरही दूरगामी परिणाम करतील. सत्तांतराच्या या प्रक्रियेत स्थानिक प्रश्नांपेक्षा राष्ट्रीय अस्मिता आणि विकासाचे मुद्दे अधिक प्रभावी ठरताना दिसत आहेत. बंगालमध्ये मा-माती-मानुषच्या जागी नवी राजकीय मांडणी उभी राहत आहे, तर केरळमध्ये दर पाच वर्षांनी सत्ता बदलण्याची परंपरा पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. या बदलांकडे केवळ एका पक्षाचा विजय किंवा पराभव म्हणून न पाहता, मतदारांच्या बदललेल्या मानसिकतेचा आरसा म्हणून पाहणे गरजेचे आहे. विशेषतः हिंदी पट्ट्यातील उत्तर प्रदेशमधील तसेच भविष्यातील २०२९ ची महालढाई लक्षात घेता, या दोन राज्यांमधील राजकीय उलथापालथ ही मोठ्या वादळापूर्वीची शांतता किंवा परिवर्तनाची पहिली लाट ठरू शकते.

दीर्घकाळ सत्तेत राहिल्याने प्रशासकीय यंत्रणा संथ आणि संवेदनशून्य बनते. धोरणात्मक निर्णयांचा अभाव आणि भ्रष्टाचाराच्या वाढत्या तक्रारींमुळे जनतेमध्ये प्रस्थापित सरकारबद्दल टोकाचा असंतोष निर्माण होतो. बदलाची ही तीव्र इच्छा मतपेटीतून व्यक्त होते, तेव्हा त्याला प्रचंड सत्ताविरोधी लाट म्हणतात. ती प्रबळ सत्ताधाऱ्यांनाही पायउतार करण्यास कारणीभूत ठरते. भ्रष्टाचाराच्या प्रकरणामुळे सरकारची नैतिक प्रतिमा मलीन होते. बंगालमधील शिक्षक भरती घोटाळा आणि केरळमधील सुवर्ण तस्करी प्रकरणाने थेट सुशिक्षित तरुण आणि मध्यमवर्गीयांच्या विश्वासाला तडा दिला. पारदर्शकतेचा अभाव आणि सत्तेचा गैरवापर मतदारांना चिथावणी देणारा ठरतो. त्यामुळे नैतिक अधिष्ठान गमावलेले शासन बदलण्याकडे जनतेचा कल वाढतो, जे सत्तांतराचे प्रमुख निमित्त ठरते. आजचा तरुण मतदार पारंपरिक वैचारिक वादविवादांपेक्षा आर्थिक प्रगती आणि रोजगाराला प्राधान्य देतो. जुन्या राजकीय अस्मितांमध्ये अडकून न पडता तो जागतिक दर्जाच्या संधी आणि आधुनिक पायाभूत सुविधांकडे ओढ दाखवतो. प्रस्थापित सरकारे अशा आकांक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरतात, तेव्हा हा वर्ग प्रबळ व्होट बँक म्हणून सत्तांतरासाठी निर्णायक भूमिका बजावतो. निवडणुकोत्तर) हिंसाचार आणि राजकीय सूडबुद्धीमुळे सामान्य नागरिकांमध्ये भीती व असुरक्षिततेची भावना निर्माण होते. राज्ययंत्रणा कायदा-सुव्यवस्था राखण्यात अपयशी ठरते, तेव्हा जनतेतील सुप्त नाराजी मतदानातून बाहेर पडते. लोकशाहीत हिंसेला स्थान नसल्याचा संदेश देण्यासाठी मतदार शांतता आणि सुरक्षिततेला प्राधान्य देत सत्ता परिवर्तनाचा मार्ग निवडतात.

केंद्र सरकारच्या थेट लाभ हस्तांतरण (डिबिटी) योजनेमुळे मध्यस्थांची साखळी मोडीत निघाली आणि मदतीची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झाली. उज्ज्वला, पीएम-किसान आणि आवास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे गरीब आणि ग्रामीण वर्गात केंद्र सरकारबद्दल विश्वासार्हता वाढली. हा कल्याणकारी राजकीय पॅटर्न प्रादेशिक अस्मितेपेक्षा अधिक प्रभावी ठरून मतदारांना सत्तांतरासाठी प्रेरित करतो. प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व कमी झाल्याने राष्ट्रीय आघाड्यांच्या नेतृत्वावरून मतभेद वाढून विरोधी ऐक्याला तडा जातो. यामुळे पूर्व आणि दक्षिण भारतात विस्तारणाऱ्या भाजपची पॅन इंडिया प्रतिमा अधिक मजबूत होत आहे. दुसरीकडे, बालेकिल्ले ढासळल्याने डाव्या विचारसरणीचे आकुंचन होऊन राजकीय पटलावर वैचारिक पोकळी निर्माण होत आहे. केंद्र आणि राज्यात एकाच विचाराची सत्ता आल्यास संघराज्य रचनेत समन्वयाचे नवे स्वरूप दिसेल, जिथे अस्मितेच्या राजकारणापेक्षा डबल इंजिन सरकारच्या विकासवादाला जनता अधिक पसंती देत असल्याचे स्पष्ट होते. पश्चिम बंगालमध्ये संघाने (आरएसएस) गेल्या अनेक वर्षांपासून सुरू ठेवलेल्या शाखा विस्तार आणि सामाजिक सेवाकार्याचा मोठा फायदा सत्ता परिवर्तनाच्या प्रक्रियेत झाला.

ग्रामीण भागातील तळागाळातील संवाद आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाची पेरणी यामुळे मतदारांचे वैचारिक ध्रुवीकरण होण्यास मदत झाली. प्रचारात प्रत्यक्ष सहभाग न घेताही, संघाच्या यंत्रणेने मतदानाची टक्केवारी वाढवण्यात आणि संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यात पडद्यामागून निर्णायक भूमिका बजावली. पश्चिम बंगालमधील कडव्या विरोधकांच्या बालेकिल्ल्यामधील यश उत्तर प्रदेशमधील भाजप नेत्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या मनोबलात प्रचंड वाढ करेल. यामुळे पक्षयंत्रणेत 'अशक्य काहीच नाही' हा आत्मविश्वास निर्माण होईल. निवडणुकीच्या रणधुमाळीमध्ये हा विजय एक सकारात्मक कथ्य (नरेटिव्ह) तयार करेल. यामुळे तळागाळातील कार्यकर्ता अधिक उत्साहाने कामाला लागेल आणि आगामी निवडणुकांसाठी पक्षाची पकड अधिक मजबूत होईल. या निकालांमुळे उत्तर प्रदेशमधील जातीय समीकरणांची पुनर्रचना होऊ शकते, जिथे ओबीसी आणि मध्यम जातींचा कल राष्ट्रीय प्रवाहाकडे झुकतो. सुशासनाचा कौल मिळाल्यास उत्तर प्रदेशमध्ये बुलडोझर मॉडेलची व्याप्ती आणि आक्रमकता अधिक वाढेल. दुसरीकडे, पराभवाच्या धास्तीने विरोधकांची रणनीती बदलून सपा-बसपा सारख्या पक्षांना अस्तित्वासाठी आघाडीचा पुनर्विचार करावा लागेल. तसेच, केरळच्या पार्श्वभूमीवर धार्मिक ध्रुवीकरणाचे स्वरूप बदलून अधिक तीव्र होण्याची शक्यता निर्माण होते. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने राजकीय समीकरणांचा विचार केला असता बंगाल आणि केरळमधील सत्तापालट संसदेतील बहुमताचे गणित पूर्णपणे बदलू शकतो, कारण या दोन राज्यांमधील ६२ जागा राष्ट्रीय राजकारणात निर्णायक ठरतील. अर्थात असेच काही तामिळनाडूमध्येही घडले. मात्र, तिथे विजय यांच्या लोकप्रियतेने टिव्हीके या पक्षाची कामगिरी द्विगुणीत झाली.

या पार्श्वभूमीवर प्रादेशिक नेत्यांचा प्रभाव कमी झाल्यामुळे पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून राष्ट्रीय नेतृत्वाची पकड अधिक घट्ट होईल, तर निवडणूक प्रचारात सांस्कृतिक राष्ट्रवाद विरुद्ध प्रादेशिक स्वाभिमान असा थेट संघर्ष पाहायला मिळेल. या विजयाचा ब्रँडिंग म्हणून वापर करून २०-२५ वयोगटातील नव्या मतदारांचा कल आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न केला जाईल. विशेषतः केरळमधील यश हे दक्षिण भारताचे प्रवेशद्वार ठरेल, ज्यामुळे तमिळनाडू आणि तेलंगणासारख्या राज्यांमध्येही राष्ट्रीय प्रवाहात सामील होण्यासाठी नवा राजकीय महामार्ग खुला होईल. केरळ आणि पश्चिम बंगालमधील हा राजकीय बदल केवळ सत्तेचे हस्तांतरण नसून भारतीय मतदारांच्या प्रगल्भ होत असलेल्या जाणिवांचा परिपाक आहे.

जुन्या वैचारिक चौकटींना छेद देत जनतेने विकास आणि स्थैर्याला दिलेली पसंती आगामी काळातील राजकारणाची दिशा स्पष्ट करते. उत्तर प्रदेशमधील आगामी रणसंग्राम असो वा २०२९ ची महालढाई, ताज्या निकालांनी सिद्ध केले की, आता केवळ प्रादेशिक अस्मिता किंवा जुन्या वैचारिक चौकटींच्या जोरावर सत्ता टिकवता येणार नाही. मतदारांचा कल राष्ट्रवाद आणि थेट विकास याकडे स्पष्टपणे झुकला असून पारंपारिक राजकारणाऐवजी निकाल देणाऱ्या राजकारणाला महत्त्व देणारा हा नवा राजकीय प्रवाह देशभर प्रस्थापित झाला आहे.

# छत्रपती संभाजी महाराज : पराक्रमाचे तेजस्वी प्रतीक

**मराठ्यांच्या** इतिहासात शौर्य, पराक्रम, त्याग, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेची असंख्य तेजस्वी उदाहरणे आढळतात. या परंपरेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून भारतीय इतिहासात अभूतपूर्व कार्य केले. मात्र या स्वराज्याचे रक्षण करताना आपल्या प्राणांची आहुती देणारे, संकटांना न डगमगता सामोरे जाणारे आणि मृत्यूला देखील हसत स्वीकारणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे छत्रपती संभाजी महाराज होय. १४ मे हा दिवस छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशभरात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका राजाचा जन्मदिन नसून स्वाभिमान, विद्वत्ता आणि अपराजित धैर्य यांच्या स्मरणाचा दिवस आहे.

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावर झाला. त्यांचे बालपण हे अत्यंत संघर्षमय आणि आव्हानात्मक परिस्थितीत गेले. त्यांचे वडील छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य उभारणीच्या कार्यात सतत व्यस्त होते, तर माता सईबाईचे निधन संभाजी महाराज लहान असतानाच झाले. त्यामुळे त्यांचे संगोपन जिजाऊ मातांच्या संस्कारांत झाले. जिजाऊंच्या सान्निध्यात त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेम, शौर्य आणि न्यायप्रियता यांचे संस्कार रुजले. बालपणापासूनच संभाजी महाराज अत्यंत बुद्धिमान, पराक्रमी आणि अभ्यासू होते. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. संस्कृत, फारसी, मराठी, हिंदी आणि पोर्तुगीज भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी अल्पवयातच 'बुधभूषण' हा संस्कृत ग्रंथ लिहिला. यावरून त्यांच्या विद्वत्तेची कल्पना येते.

संभाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व केवळ योद्ध्याचे नव्हते, तर ते एक कुशल प्रशासक, अभ्यासू साहित्यिक आणि दूरदृष्टी असलेले राजकारणी होते. त्यांच्या आयुष्यातील अनेक प्रसंग हे संघर्ष आणि कटकारस्थानांनी भरलेले होते. आग्रा येथे औरंगजेबाच्या कैदेतून सुटका करताना त्यांनी दाखवलेले धैर्य उल्लेखनीय होते. शिवाजी महाराजांसोबत त्यांनी संकटांना सामोरे जात स्वराज्याचे धडे घेतले. बालवयातच त्यांनी युद्धकला, राजकारण आणि प्रशासन यांचे शिक्षण घेतले. त्यामुळे पुढे राज्यकारभार सांभाळताना त्यांना अनेक अनुभवांचा उपयोग झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर स्वराज्यावर मोठे संकट आले. अंतर्गत राजकीय मतभेद आणि बाह्य शत्रूंचे आक्रमण अशा कठीण परिस्थितीत संभाजी महाराजांनी स्वराज्याची धुरा सांभाळली. १६८१ मध्ये त्यांचा राज्याभिषेक झाला आणि त्यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले. त्यांच्या कारकिर्दीचा काळ हा अत्यंत संघर्षमय होता. मुघल सम्राट औरंगजेबाने दक्षिणेत उतरून मराठ्यांचे राज्य संपविण्याचा निर्धार केला होता. त्याच वेळी सिद्दी, पोर्तुगीज आणि इंग्रज यांच्याशीही संघर्ष सुरू होता. अशा परिस्थितीत संभाजी महाराजांनी धैर्याने आणि चातुर्याने शत्रूंना तोंड दिले. संभाजी महाराज हे अत्यंत पराक्रमी सेनानी होते. त्यांनी अनेक युद्धांमध्ये आपल्या नेतृत्वाचे दर्शन घडवले. त्यांच्या नेतृत्वाखाली मराठा सैन्याने मुघलांना वारंवार पराभूत केले. औरंगजेबासारख्या बलाढ्य सम्राटालाही संभाजी महाराजांचे सामर्थ्य जाणवले होते. त्यांनी आपल्या सैन्याला प्रेरणा देत स्वराज्य टिकवून ठेवले. त्यांच्या युद्धनीतीमध्ये वेग, गनिमी कावा आणि अचूक नियोजन यांना विशेष महत्त्व होते. मराठा सैन्याची ताकद वाढविण्यासाठी त्यांनी अनेक उपाययोजना केल्या.

१६८९ मध्ये संगमेश्वर येथे आपल्यातीलच काहींच्या फितुरीमुळे संभाजी महाराज आणि कवी कलश मुघलांच्या ताब्यात गेले. औरंगजेबाने त्यांना अमानुष छळ दिला. त्यांच्या डोळ्यांसमोर अत्याचार करण्यात आले, शरीराचे हाल करण्यात आले, तरीही त्यांनी स्वाभिमान सोडला नाही. अखेर ११ मार्च १६८९ रोजी त्यांची क्रूर हत्या करण्यात आली. मात्र त्यांच्या बलिदानामुळे मराठ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आणि स्वराज्य अधिक बळकट झाले. छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाचे महत्त्व केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही. त्यांनी दिलेला संदेश संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. संकटे कितीही मोठी असली तरी स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठा यांचा त्याग करू नये, हे त्यांनी आपल्या जीवनातून दाखवून दिले. त्यांचे बलिदान हे भारतीय संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेले महान योगदान आहे. संभाजी महाराज अत्यंत विद्वान, संवेदनशील आणि कुशल शासक होते. त्यांनी राज्यकारभारात शिस्त, न्याय आणि प्रजेच्या हिताला प्राधान्य दिले. त्यांनी शेतकरी, सैनिक आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष दिले. संभाजी महाराजांच्या विद्वत्तेचा विचार केला तर ते त्या काळातील अत्यंत अभ्यासू राजांपैकी एक होते. त्यांनी संस्कृत साहित्याचा सखोल अभ्यास केला होता. 'बुधभूषण' या ग्रंथामध्ये त्यांनी राजकारण, नीतिशास्त्र आणि प्रशासन यांवर विचार मांडले आहेत. युद्धाच्या धामधुमीतही साहित्य आणि ज्ञान यांच्याशी त्यांची नाळ जोडलेली होती. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक व्यापक आणि प्रेरणादायी ठरते. संभाजी महाराजांनी मराठा साम्राज्य टिकवून ठेवण्यात मोलाची भूमिका बजावली. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे रक्षण करणे हे अत्यंत कठीण काम होते. कारण मुघल साम्राज्य त्या काळी अत्यंत बलाढ्य होते. औरंगजेब स्वतः दक्षिणेत उतरला होता. अशा परिस्थितीत संभाजी महाराजांनी जवळपास नऊ वर्षे संघर्ष करत स्वराज्य टिकवून ठेवले. त्यांनी कधीही शत्रूपुढे शरणागती पत्करली नाही. त्यांच्या नेतृत्वामुळे मराठ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी औरंगजेबाला प्रखर प्रतिकार केला. संताजी घोरपडे, धनाजी जाधव आणि इतर मराठा सरदारांनी मुघल सैन्याला हैराण केले. अखेरीस औरंगजेबाचा दक्षिणेतील मोहिमेमध्ये पराभव झाला. यामागे संभाजी महाराजांनी निर्माण केलेली प्रेरणा आणि स्वराज्यनिष्ठा कारणीभूत होती.

छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन आजच्या तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. आजच्या काळात स्वार्थ, भौतिकता आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास दिसून येतो. अशा वेळी संभाजी महाराजांचे जीवन आपल्याला राष्ट्रप्रेम, धैर्य, संघर्षशीलता आणि नीतिमूल्यांची जाणीव करून देते. त्यांनी संकटांना घाबरून न जाता त्यांचा सामना केला. त्यांनी परिस्थितीसमोर कधीही हार मानली नाही. हा संदेश आजच्या युवकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. आज महाराष्ट्रात आणि देशभरात संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. व्याख्याने, मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम आणि इतिहास अभ्यास शिबिरे यांच्या माध्यमातून त्यांच्या कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहोचवली जाते. अनेक युवक संघटना आणि सामाजिक संस्था त्यांच्या विचारांचा प्रचार करतात. मात्र केवळ जयंती साजरी करणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांचे आणि आदर्शांचे पालन करणे अधिक महत्त्वाचे आहे.

संभाजी महाराजांचा इतिहास हा केवळ युद्धांचा इतिहास नाही, तर तो संस्कृती रक्षणाचा इतिहास आहे. त्यांनी हिंदवी स्वराज्याच्या माध्यमातून सर्व समाजघटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या सैन्यात विविध जाती-धर्मांचे लोक होते. त्यांनी कधीही जातीय किंवा धार्मिक द्वेषाला प्रोत्साहन दिले नाही. न्याय, समानता आणि स्वराज्य हीच त्यांची भूमिका होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची कणखर निर्णयक्षमता. कठीण प्रसंगांमध्ये त्यांनी धैर्याने निर्णय घेतले. युद्धभूमीवर ते स्वतः सैनिकांसोबत लढत असत. त्यामुळे सैनिकांमध्ये त्यांच्याविषयी विशेष आदर होता. राजा असूनही त्यांनी कधीही ऐषआरामाला प्राधान्य दिले नाही. त्यांचे जीवन संघर्ष आणि कर्तव्यनिष्ठेचे प्रतीक होते.

संभाजी महाराजांच्या काळात मराठा आरमारालाही महत्त्व होते. सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्याविरुद्ध त्यांनी समुद्री संरक्षण मजबूत करण्याचा प्रयत्न केला. किनारपट्टीवरील किल्ले आणि व्यापार यांचे रक्षण करण्यासाठी त्यांनी उपाययोजना केल्या. यावरून त्यांच्या प्रशासनातील दूरदृष्टी स्पष्ट होते.

संभाजी महाराजांचे जीवन हे त्यागाचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्यांनी स्वतःच्या सुखाचा कधी विचार केला नाही. स्वराज्य आणि धर्मरक्षण हेच त्यांचे ध्येय होते. मृत्यू समोर असतानाही त्यांनी आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. त्यामुळे ते भारतीय इतिहासातील अमर वीर ठरतात.

आजच्या काळात इतिहासाचे योग्य आकलन होणे अत्यंत आवश्यक आहे. इतिहास केवळ गौरवासाठी नसतो, तर तो वर्तमान आणि भविष्य घडविण्यासाठी मार्गदर्शक असतो. संभाजी महाराजांचा इतिहास आपल्याला संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणा देतो. त्यांनी संकटांना संधीमध्ये बदलले आणि स्वराज्य टिकवून ठेवले. संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनातील मूल्यांचा विचार करणे गरजेचे आहे. राष्ट्रप्रेम, स्वाभिमान, कर्तव्यनिष्ठा, विद्वत्ता आणि धैर्य ही मूल्ये समाजात रुजली तरच त्यांना खरी आदरांजली ठरेल. आजच्या युवकांनी त्यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करून त्यातून प्रेरणा घ्यावी. मोबाईल आणि सामाजिक माध्यमांच्या आहारी जाण्याऐवजी इतिहासातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवणे आवश्यक आहे.

छत्रपती संभाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे, तर संपूर्ण भारताचे प्रेरणास्थान आहेत. त्यांचे बलिदान भारतीय संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेले महान योगदान आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी राष्ट्रहित, सामाजिक एकता आणि नैतिक मूल्ये जपण्याचा संकल्प केला पाहिजे.

मराठ्यांच्या इतिहासातील तेजस्वी पर्व म्हणून संभाजी महाराजांचे नाव सदैव स्मरणात राहील. त्यांचे जीवन संघर्षाचे, शौर्याचे आणि अटळ निष्ठेचे प्रतीक आहे. त्यांनी दाखवून दिले की कोणतेही संकट मनुष्याच्या आत्मबलापुढे मोठे नसते. अन्यायाविरुद्ध उभे राहणे, सत्यासाठी लढणे आणि राष्ट्रासाठी बलिदान देणे हेच खरे जीवनमूल्य आहे.

आजही महाराष्ट्रातील गड-किल्ले संभाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देत उभे आहेत. प्रत्येक किल्ला त्यांच्या संघर्षाची कहाणी सांगतो. त्यांच्या स्मृती आजही जनमानसात जिवंत आहेत. गावागावांतून त्यांच्या जयंतीनिमित्त उत्साह दिसून येतो. युवकांच्या मनात त्यांच्याविषयी विशेष आकर्षण आणि आदर आहे. संभाजी महाराजांचे विचार समाजाला एकत्र आणणारे आहेत. त्यांनी अन्यायाविरुद्ध संघर्ष केला, पण कधीही मानवतेचा त्याग केला नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात शौर्याबरोबरच संवेदनशीलताही होती. प्रजेच्या कल्याणासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. त्यामुळे ते लोकाभिमुख राजा म्हणूनही ओळखले जातात. छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांनी त्यांच्या जीवनावर आधारित अभ्यास, व्याख्याने आणि उपक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. इतिहासाचे योग्य ज्ञान मिळाल्यास युवकांमध्ये राष्ट्रप्रेम आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण होईल.

छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन हे एका जाज्वल्य राष्ट्रभक्ताचे जीवन होते. त्यांनी स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता स्वराज्याचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे मराठा साम्राज्य अधिक मजबूत झाले आणि पुढे पेशव्यांच्या काळात मराठ्यांनी दिल्लीपर्यंत झेंडा फडकवला. त्यामुळे संभाजी महाराजांचे योगदान मराठा साम्राज्याच्या विस्तारामध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य केले पाहिजे. भ्रष्टाचार, अन्याय, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून मिळते. स्वाभिमानी, चारित्र्यसंपन्न आणि राष्ट्रनिष्ठ नागरिक घडविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. छत्रपती संभाजी महाराज हे भारतीय इतिहासातील अजरामर व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे शौर्य, विद्वत्ता आणि बलिदान यामुळे ते सदैव जनमानसात जिवंत राहतील. १४ मे रोजी साजरी होणारी त्यांची जयंती ही केवळ उत्सव नसून प्रेरणेचा आणि स्वाभिमानाचा दिवस आहे. त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या आदर्शांचे पालन करण्याचा निर्धार केला पाहिजे. राष्ट्र आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी आवश्यक असलेली जिद्द, धैर्य आणि निष्ठा यांचे तेजस्वी उदाहरण म्हणून छत्रपती संभाजी महाराजांचे नाव भारतीय इतिहासात सदैव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

# स्वाभिमानाची प्रेरणा देणारा छावा महाप्रतापी धर्मवीर संभाजी महाराज

**छत्रपती** संभाजी महाराजांचा जन्म १४ मे इ.स.१६५७ रोजी पुरंदर येथे झाला आणि हिंदवी स्वराज्यात तेजस्वी तारा प्रगट झाला.राजपुत्र असल्यामुळे रणांगणातील मोहीम व राजकारणातील डावपेच यांचा संपूर्ण अभ्यास अवगत होता. त्याचप्रमाणे लहानपणापासूनच ते अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मोठे धनी होते. संभाजींना लहानपणापासूनच अनेक कठीणायीचा सामना करावा लागला.संभाजी महाराज लहान असतांनाच त्यांच्या आई महाराणी सईबाई यांचे निधन झाले आणि त्यांच्या काळजावर मोठा आघात झाला.या आघातापासुन सावरण्यास राजमाता जिजाबाई यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी व रक्षणासाठी शूरवीर संभाजी नावाचा महामेरू उभा केला. संभाजींची सावत्र आई पुतळाबाई यांनी आपल्या मुलासारखी वागणुक देवुन वटवृक्षाचे काम केले.परंतु त्यांची दुसरी सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजीराजांच्या रस्त्यात बाभळीचे काटे रोवुन पोरकेपणाची वागणुक दिली व महाराजांच्या राजकीय कारकीर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. संभाजीच्या मनात लहानपणापासूनच आपण स्वराज्यासाठी काहीतरी केले पाहिजे.या उद्देशाने त्यांनी राजकारणातील संपूर्ण बारकावे आत्मसात केले. मुगलांच्या घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले.त्याचप्रमाणे संस्कृतसह इतर आठ भाषांचे ज्ञान त्यांना अवगत होते.याचा फायदा भविष्यात व्हावा या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले.त्यावेळी संभाजीराजे फक्त ९ वर्षाचे होते.शिवाजी महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेतुन निसटल्यानंतर त्यांना संभाजींची चिंता वाटू लागली.औरंगजेब आगबबुला झाला अशा वेळी संभाजीराजे स्वराज्यात सुखरूप पोहचावे या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा सर्वत्र पसरवून मोगलांच्या डोळ्यात धुळ झोकून संभाजींना महाराष्ट्रात सुखरूप पोहचण्याचा मार्ग मोकळा केला.इ.स.१६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला.शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या १२ दिवसातच राजमाता जिजाऊंचे निधन झाले आणि पुन्हा संभाजींना मोठा जब्बर धक्का बसला.त्यानंतर त्यांच्याकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही. कारण शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.छत्रपती संभाजीं महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतरन करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज व मोगल सत्ताधाऱ्यांचा कडाडून विरोध केला.औरंगजेबाने इ.स.१६८२ साली मराठ्यांवर हल्ला केला.औरंगजेब सैन्य, दारूगोळा, हत्ती-घोडे याबाबतीत बलशाली होता. कारण औरंगजेबाचे सैन्य संभाजीं महाराजांच्या तुलनेत ५ पटीने अधिक होते.त्याकाळी जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यामध्ये औरंगजेबाचा समावेश होता. तरीही संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी हिमतीने लढा दिला.त्याचप्रमाणे संभाजीं महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याच्या सिद्धी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना जोरदार धडा शिकवला.त्यामुळे संभाजीं महाराजांच्या विरूद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत कोणाचीही झाली नाही. कारण त्याकाळी संभाजीं म्हणजे एक वादळी तुफान होते. त्यामुळेच संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी मोठ्या शिताफीने झुंज दिली.इ.स.१६८९ च्या सुरूवातीला संभाजीं महाराजांनी त्यांच्या महत्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणातील संगमेश्वर येथे बोलावले.परंतु आपल्याच लोकांनी विश्वासघात केला व संभाजी महाराजांच्या स्थानाची माहिती मोगलांना दिली. यात गणोजी शिर्के हे महाराजांचे मेहुणे होते व कान्होजी शिर्के हे दोघेही छत्रपती संभाजी महाराजांचे जवळचे नातेवाईक होते. परंतु वतनाच्या मुद्यावरून त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा विश्वासघात केला. यालाच म्हणतात 'घर का भेदी लंका ढाये'१ फेब्रुवारी इ.स.१६८९ रोजी संभाजीं महाराज




रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला.मराठ्यात आणि शत्रूच्या सैन्यात मोठी चकमक झाली.मराठ्यांचे संख्याबळ कमी असल्याने शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाही.त्यामुळे शत्रूने संभाजीं महाराजांना व त्यांच्या सोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले. अशाही परीस्थितीत महाराजांना वाचविण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला.परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत.पहिला प्रयत्न जोत्याजी केसरकर यांनी केला. यानंतर अप्पा शास्त्री यांनी देखील केला.परंतु दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले व संभाजीं महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले.औरंगजेबाच्या तावडीत सापडल्या नंतर औरंगजेबाने महाराजांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती केली.परंतु त्यांनी आपल्या धर्माचे पालन करत इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला. त्याचप्रमाणे राज्याचा संपूर्ण खजाना आमच्या स्वाधीन करावा अशी अट घातली तेही संभाजीं महाराजांनी मान्य केली नाही.संभाजी राजांचा धीटपणा आणि स्वराज्याच्या प्रती प्रेम पाहून औरंगजेब तिलमिला झाला आणि तेव्हा पासून संभाजीं महाराजांना यातना देण्यास सुरुवात केली.तरीही औरंगजेबाची कोणतीही अट माणन्यास व त्यांच्या सामोरं यत्किंचितही झुकण्यास महाराज तयार नव्हते. संभाजी महाराजांनी औरंगजेबाला खडसावून सांगितले की स्वराज्याच्या रक्षणासाठी व प्रजेच्या हितासाठी कोणतीही तडजोड करणार नाही. यासाठी माझे प्राण गेले तरी चालेल. अशी सिंह गर्जना ऐकताच औरंगजेबाने संभाजी महाराजांना कठोर यातना देण्यास सुरुवात केली. औरंगजेबाने महाराजांचे डोळे काढले, महाराजांची जीभ कापली, महाराजांवर अतोनात वार करण्यात आले.हे सगळं संभाजीं महाराज ४० दिवस सहन करीत होते. तरीही मराठा साम्राज्यासाठी लढत राहाले. एवढ्याच छळाने सुध्दा औरंगजेबाचा आत्मा शांत झाला नाही. शेवटी औरंगजेबाने आपली संपूर्ण क्रूरतेची हद पार केली व ११ मार्च १६८९ रोजी महाराजांचे हात-पाय, आणि त्यांचे सर्व देह शरीरापासून वेगळे करून त्यांची क्रूरतेने हत्या करण्यात आली.शेवटी औरंगजेब हताश होऊन म्हणतो की 'माझ्या पोटी असा शूरवीर, धाडसी पुत्र जन्माला का आला नाही?'याची खंत त्याला मरेपर्यंत सतावत होती.शत्रूला हेवा वाटेल असे महान कार्य संभाजीं महाराजांनी केले व जगाच्या इतिहासात कमी वयात म्हणजे ३२ व्या वर्षी स्वराज्याच्या व प्रजेच्या रक्षणासाठी बलिदान देणारा राजा म्हणून संभाजीं महाराजांसमोर आज सर्वच नतमस्तक होतात. संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम. महाराष्ट्र हा शूर वीरांचा व धर्मवीरांचा आहे.याची जान आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यातील भ्रष्टाचार, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी, आरोग्य , शिक्षण इत्यादी समस्याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.यामुळे जनतेला (प्रजेला) सुख-समाधान प्राप्त होईल.कारण आज आपण जो मोकळा श्वास घेतो व हसतो-बागडतो आहोत तो छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुंण्यायीमुळेच. हीबाब आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. महाराष्ट्र ही संतांची, शुर वीरांची, थोर महात्म्यांची व क्रांतीकारकांची पावणभुमि आहे.याची जोपासना आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करने अत्यंत गरजेचे आहे.धर्मवीरांनी महाराष्ट्र घडवीण्यासाठी बलीदान दिले.परंतु आजचा राजकीय पुढारी गरीब, सर्वसामान्य, शेतकरी यांचे रक्त भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पीत आहे व शोषण करीत आहे.याची खंत धर्मवीर संभाजी महाराज, साधुसंत, थोर पुरुष, क्रांतीकारक व आपले पुर्वज यांना अवश्य होत असेल.त्यामुळे कोणत्याही महापुरुषांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे व संभाजीं महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन पुढील वाटचाल व्हायला हवी.यातच आपल्याला धर्मवीर संभाजी महाराज दिसून येईल. आज बदलत्या हवामानामुळे प्रदूषणाच्या विळख्यात संपूर्ण पृथ्वी आहे.तीला वाचविण्यासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून युध्दपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण आज लावलेले वृक्ष शेकडो काळ टिकेल. याच वृक्षांच्या पाणात, फुलात, फळात व जळामुळात संपूर्ण थोर महात्म्याचे व शुरविरांचे दर्शन अवश्य होईल.त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ले सुसज्जित करून पर्यटनासाठी मोकळी करावीत. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण-शान आहे. त्यामुळे त्यांची जपणूक केलीच पाहिजे. यामुळे नवीन पिढीला संपूर्ण गडकिल्ल्यांचा इतिहास समजण्यास सुलभ जाईल आणि शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज समजूत येईल.कारण याच गडकिल्ल्यात महाराष्ट्राची संपूर्ण खरी संस्कृती दडलेली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम व मानाचा मुजरा. हर हर महादेव!

- रमेश कृष्णराव लांजेवार.
( स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# शनि अमावस्येनिमित्त पैठण येथे महामस्तक अभिषेक महोत्सवाचे आयोजन

**आचार्य सिद्धांत सागरजी महाराज आचार्य गुनभद्रनदीजी महाराज ससंघ उपस्थित राहणार**





छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) - श्री शनिग्रह अरिष्ट निवारक मुनिसुव्रतनाथ भगवान अतिशय क्षेत्र येथे शनि अमावस्येनिमित्त दिनांक १६ मे, शनिवार रोजी भव्य महामस्तक अभिषेक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. भारतातील जैन धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या मूलनायक भगवान मुनिसुव्रतनाथ यांच्या धार्मिक सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे.

संपूर्ण कार्यक्रम आचार्य सिद्धांतसागरजी महाराज आचार्य गुनभद्रनदीजी महाराज ससंघ यांच्या पावन सान्निध्यात तसेच आचार्य प्रसन्नसागरजी महाराज यांच्या आशीर्वादाने पार पडणार आहे. सकाळी ८ वाजता भगवान मुनिसुव्रतनाथ विधान, त्यानंतर धर्मध्वजारोहण व महामस्तक अभिषेक विधी होणार आहे.

या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून देवेंद्र स्नेहदेवी सूरजमल दिल्ली, अमित बडजाते, निलम अजमेरा, रतनलाल पहाडिया, विनय सुरथेधाने, अशोक जैन व मनोज चौधरी उपस्थित राहणार आहेत.

महोत्सवानिमित्त हजारो भाविकांसाठी प्रतिभा, स्वयं, प्रियंका, सौरभ, इति, जीत, ओमाश, विवान सिद्धीत अजमेरा परिवार, धाराशिव यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे मंच संचालन बोलीसम्राट प्रविण लोहाडे करणार आहेत. धर्मप्रेमी व तीर्थभक्तांनी अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष महावीर बडजाते, महामंत्री विलास पहाडे, कोषाध्यक्ष विजय पापडीवाल, विश्वस्त जयकुमार बाकलीवाल, प्रमोद कासलीवाल, मनोज काला, प्रकाश कासलीवाल, कैलास पाटणी, किशोर भाकरे, सुमीत गंगवाल, डॉ. संजय गंगवाल, डॉ. राजेंद्र काला, स्वदेश पांडे, अभिजीत काला यांच्यासह विश्वस्त मंडळाने केले आहे.

या महोत्सवासाठी छत्रपती संभाजीनगर, हैदराबाद, मुंबई, पुणे, नाशिक, जयपूर, राजस्थान, दिल्ली आदी ठिकाणांहून हजारो भाविक उपस्थित राहणार असल्याची माहिती प्रचार-प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

# मनमानी भाडेवाढ करणाऱ्या खासगी बस वाहतूकदार आणि अवैध प्रवासी ॲप्सवर कारवाई करा - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

## दीर्घकालीन उपाययोजनांसाठी समितीची स्थापना

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - राज्यातील खासगी प्रवासी बस वाहतूकदारांकडून केली जाणारी बेकायदेशीर दरवाढ आणि अनधिकृत मोबाईल ॲप्सद्वारे प्रवाशांची होणारी आर्थिक पिळवणूक याबाबत शासन गंभीर असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. या संदर्भातील तक्रारींचे निराकरण करण्यासाठी तसेच दीर्घकालीन उपाययोजना सुचविण्यासाठी सह परिवहन आयुक्त आणि सुराज्य अभियानातील तीन प्रतिनिधींचा समावेश असलेली विशेष समिती गठित करण्याचे म हत्त्वपूर्ण निर्देश त्यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

या बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर तसेच सुराज्य अभियान संघटनेचे अभिषेक मुरुकटे, अरविंद पानसरे, सुनील हनवट आदी उपस्थित होते.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, गठित समिती खासगी बसच्या भाडेवाढीवर नियंत्रण मिळवणे, अवैध बुकिंग ॲप्सना आळा घालणे आणि प्रवाशांच्या तक्रारींवर प्रभावी उपाययोजना सुचविणे याबाबत सविस्तर अहवाल सादर करेल. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील बैठकीचे आयोजन करण्यात येईल. समितीने सुचविलेल्या उपाययोजनांची राज्य सरकारकडून प्रभावी आणि तातडीने अंमलबजावणी केली जाईल, असे आश्वासनही परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी दिला. सध्या अनेक खासगी ट्रॅव्हल्स कंपन्या अनधिकृत ॲप्सच्या माध्यमातून प्रवाशांचे बुकिंग करत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहे. सण-उत्सव किंवा सुट्ट्यांच्या काळात प्रवाशांकडून अव्वाच्या सव्वा तिकीट दर आकारले जातात. प्रवाशांची आर्थिक लूट करणाऱ्या अशा प्रवासी बस वाहतूकदारांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत प्रवाशांची लूट खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

राज्यातील बसस्थानकांवरील संपर्क यंत्रणा अधिक सक्षम आणि प्रभावी करणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी प्रत्येक बसस्थानकावर प्रवासी सुविधांसाठी संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या. तसेच, परिवहन विभागाने नावे बदललेल्या गावांबाबत आणि व्याकरणदृष्ट्या अचूक मराठी भाषेचा वापर करण्याबाबत परिपत्रक जारी करावे व त्याची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असेही त्यांनी निर्देश दिले. राज्यातील एसटी बस आणि बसस्थानकांच्या अस्वच्छतेबाबत प्रवाशांकडून वारंवार तक्रारी प्राप्त होत आहे. बसस्थानकांचा कायापालट करण्यासाठी आणि कायमस्वरूपी स्वच्छता राखण्यासाठी ठोस पावले उचलण्यात येत आहेत. १ जूनपासून महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवरील स्वच्छतागृहे मोफत करण्यात येणार असून, प्रवाशांना उत्तम दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी सांगितले

# नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मान्यवरांच्या हस्ते अनावरण

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित होत आहे. या कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.




कुंभमेळ्याच्या लोगोसाठी कुंभमेळा प्राधिकरणाच्यावतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सुमारे तीन हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धकांमधून तीन उत्कृष्ट स्पर्धकांचा यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक पटकावलेल्या पुणे येथील सुमित काटे यांना तीन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या नोएडा येथील मयांक नायक यांना दोन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह आणि तृतीय क्रमांक पटकावलेल्या पंढरपूर येथील पीयुष पिंपळनेरकर यांचा एक लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रसून जोशी, अश्विनी देशपांडे, मंदार राणे, वृषाली केकणे (देशमुख), बारिश दाते, विनय नारंग, डॉ. प्राजक्ता बास्ते, प्रफुल्ल सावंत, डॉ. दिनेश वैद्य, अँथनी लोपेझ आणि डॉ. किरण शिंदे यांसारख्या दिग्गज डिझाइन तज्ज्ञांच्या समितीने या प्रवेशिकांचे परिक्षण केले. सर्जनशीलता, नाविन्य, ब्रँड सुसंगतता आणि सादरीकरण या निकषांवर आधारित ही निवड करण्यात आली. या समितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी प्रास्ताविकाद्वारे कुंभमेळा आयोजन आणि लोगो स्पर्धेबाबत माहिती दिली.

यावेळी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांच्यासह विविध आखाड्यांचे साधू, संत उपस्थित होते. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी यावेळी उपस्थित साधू संतांचे स्वागत केले.

**नाशिक - त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाविषयी**

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, 'मायगव्ह' आणि 'असोसिएशन ऑफ डिझाइनर्स ऑफ इंडिया' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या देशव्यापी डिझाइन स्पर्धेतून या बोधचिन्हाची निवड करण्यात आली. २० नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत मायगव्ह प्लॅटफॉर्मवर पार पडलेल्या या स्पर्धेत ७० आंतरराष्ट्रीय स्पर्धकांसह एकूण ३,०६७ प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या. सहभागाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर राहिले, त्याखालोखाल दिल्ली आणि तामिळनाडूचा क्रमांक लागला. १८ ते २४ वयोगटातील तरुणांनी या स्पर्धेत सर्वाधिक सक्रिय सहभाग नोंदवला.

हे बोधचिन्ह नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या पवित्र भूगोल आणि धार्मिक परंपरांवर आधारित आहे.

**भगवान शंकराचे त्रिशूळ: आध्यात्मिक उर्जेचे प्रतीक.**

त्र्यंबकेश्वर मंदिर: प्रादेशिक वारशाचे दर्शन घडवणारी मंदिराची प्रतिकृती.

काळाराम मंदिराची कमान आणि गोदावरी नदी: गोदावरी नदीला 'शिवलिंगा'च्या रूपात दर्शविण्यात आले असून, ते कुंभमेळ्यातील पवित्र स्नानाच्या परंपरेचे महत्त्व अधोरेखित करते.

# वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह गुणवंत सन्मान पुरस्कारासाठी नोंदणीस प्रारंभ

छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) - परदेशी, राजपूत समाजातील गुणवंतानी महाराणा प्रतापसिंह गुणवंत पुरस्कार साठी नांव नोंदणी करावी असे आवाहन शिवराणा सेवा संघ यांच्या वतीने करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवराणा सेवा संघ वतीने वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह गुणवंत सन्मान पुरस्कारासाठी नोंदणी करावी अहवान शिवराणा सेवा संघ वतीने करण्यात आले आहे. भव्य दिव्य गुणवंत विद्यार्थी बरोबर शासकीय सेवेत नव्याने निवड करण्यात आली.

युपीएससी व एमपीएससी राज्यसेवेतून निवड करण्यात आली आहे. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच जिल्हा व राज्य पातळीवर खेळाडू चा सन्मानित करण्यात येणार आहे व विविध क्षेत्रातील मान्यवर कार्य करणाऱ्या मान्य वरांना समाज भूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

दहावी व बारावीच्या परीक्षेत ७० टक्के पैक्षा अधीक गुण मिळाले आहे. त्यांनी नोंदणी करावी परदेशी राजपूत समाजातील गुणवंतानी मार्गदर्शन केले जाते गुणवंत पुरस्कार सोहळ्यात व्यक्ते मार्गदर्शन करतात नांव नोंदणी करावी शिवराणा सेवा संघ नांव नोंदणी खालील कमेटीकडे करण्याचे आवाहन शिवराणा सेवा संघातर्फे करण्यात आले. एल.डी. ताटू अध्यक्ष ८३०८१३६६८९, भोरासिंग राजपूत, आनंद बारवाल, अंजली कोकुल्डे, फुलसिंग राजपूत आदी.

# 'देऊळ बंद २' चित्रपट २१ मे रोजी सिनेमागृहात 'आता परीक्षा देवाची'च्या टीझरने वेधले लक्ष

छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) - श्रद्धा आणि अंधश्रद्धा, देव आणि नास्तिक यांच्यातील युद्धाने आजवर अनेक वळणे घेतली आहेत. मात्र, जेव्हा एक सामान्य स्त्री थेट देवालाच परीक्षेला बसवते, तेव्हा काय होते? याच उत्कंठावर्धक विषयावर आधारित 'वटवृक्ष एंटरटेनमेंट' निर्मित बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित 'देऊळ बंद २' हा चित्रपट २१ मे रोजी प्रदर्शित होत आहे.



चित्रपटाचा टिझर नुकताच श्री क्षेत्र अक्कलकोट येथील वटवृक्ष श्री स्वामी समर्थ मंदिरात प्रदर्शित करण्यात आला. काही तासातच तुफान व्हायरल झालेल्या टीझरने स्वामी भक्तांच्या आणि रसिकांच्या मनात चित्रपटाची उत्सुकता अजूनच वाढली आणि सर्वांनी 'देऊळ बंद २' आम्ही चित्रपटगृहात जाऊन नक्की बघणार अशी ग्वाही विविध माध्यमातून दिली. नदीकाठचा निसर्गरम्य परिसर, भव्य वडाचे झाड आणि एका बाजूला स्वामींची जरब तर दुसऱ्या बाजूला एका सामान्य स्त्रीचे धैर्य, असा हा सामना खिळवून ठेवणारा आहे. आता या परीक्षेत स्वामी कोणत्या प्रश्नांना समोरे जाणार आणि शेतकऱ्यांच्या कोणत्या समस्यांचे निवारण करणार? हे बघण्यासाठी प्रेक्षकांना २१ मे पर्यंत वाट बघावी लागणार आहे.

२१ मे २०२६ रोजी प्रदर्शित होणाऱ्या वटवृक्ष एंटरटेनमेंट निर्मित 'देऊळ बंद २' चे लेखन आणि दिग्दर्शन प्रविण विठ्ठल तरडे यांनी केले असून निर्मिती कैलाश वाणी, जयश्री कैलाश वाणी, कैवल्य वाणी आणि जुईली वाणी-सूर्यवंशी यांनी केली आहे. चित्रपटात मोहन जोशी आणि स्नेहल तरडे प्रमुख भूमिकेत दिसणार असून महेश मांजरेकर, प्रसाद ओक, मंगेश देसाई, ओम भुतकर, संस्कृती बालगुडे, जगन्नाथ निवंगुणे, सुनील अभ्यंकर, अतुल कुडले आणि प्रविण तरडे महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. देऊळ बंद २ - आता परीक्षा देवाची' च्या टीझरमध्ये स्वामी म्हणतात अगं ए नास्तिके प्रत्येक युगात तुझ्या सारखे कित्येक रावण आणि कित्येक दुर्योधन पाहिलेत मी देवाची परीक्षा पाहणारेङ्क त्यावर शेतकरी महिला म्हणते लिहून देते, कधी शेतकरी नसल पाहिला. त्यांच्या या संवादावरून 'देऊळ बंद २' मध्ये आपल्या कुटुंबासाठी आणि समाजासाठी एक गरीब शेतकरी महिला देवाची सुद्धा परीक्षा घेऊ शकते हे स्पष्ट होत आहे.

# पावसाळापूर्व शेती मशागतीच्या कामांना वेग, १४ मे पासून अवकाळी पावसाचा अंदाज

जळगाव, दि. १३ (प्रतिनिधी) - गेल्यावर्षी मे महिन्याच्या सुरुवातीलाच पावसाने अनपेक्षित हजेरी लावली होती. तशीच परिस्थिती यंदाच्या मे महिन्यात उद्भवणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. मागील वर्षी मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसात रब्बी पिकांसह चाऱ्याचे अतोनात नुकसान झाले होते. हा कडवट अनुभव गाठीशी असलेला बळीराजा यावर्षी कमालीचा सावध झाला असून पावसाळा सुरू होण्यापूर्वीच रब्बीची कामे उरकून खरिपासाठी शेत तयार ठेवण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे.

पाचोरा तालुक्यात गव्हाची काढणी पूर्ण झाली असून भुईमूग, ज्वारी आणि मका यांसारख्या लांब पल्ल्याच्या पिकांची काढणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. सध्या शेतात मका काढणी, चारा कुट्टी करणे आणि तो सुरक्षित स्थळी साठवणे ही कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. ही सर्व कामे पूर्णपणे यांत्रिकीकरणावर अवलंबून असल्याने कडबा कुट्टी मशिन, मका हार्वेस्टिंग मशिन, खत वाहतुकीसाठी ट्रॅक्टर या मशिनरी मिळवण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी ओढाताण होताना दिसत आहे. अवकाळी पाऊस कधीही येऊ शकतो. या भीतीने शेतकरी या मशिनरीवाल्यांच्या मागे धावत असल्याचे चित्र आहे.

**पीक बदलाची शक्यता** - हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, यावर्षी पावसाळा काहीसा 'तुटक' स्वरूपाचा राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेती नियोजनावर मोठा परिणाम होण्याची चिन्हे दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी पिक निवडीकडे पुन्हा एकदा गांभीर्याने पाहण्यास सुरुवात केली आहे. मागील हंगामातील अनुभव लक्षात घेऊन शेतकरी अधिक शाश्वत व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर पर्याय शोधत आहेत. त्यामुळे यंदा कापूस क्षेत्र वाढण्याची शक्यता कृषी क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे.

**शेत सज्जतेसाठी लगबग** -रब्बी पिकांची आवराआवर झाल्यानंतर शेतकरी लगेच खरिपाच्या पूर्वतयारीला लागला आहे. शेत नांगरटी, रोटावेटर फिरवणे आणि शेतात शेणखत पसरवणे या काम ांनी वेग घेतला आहे. शेत वेळेवर तयार असेल तरच पावसाच्या पहिल्या सरीसोबत पेरणी करता येईल, या हिशोबाने शेतकरी कामात गर्क आहेत. अवकाळीने चारा खराब होऊ नये, ही यावर्षी शेतकऱ्यांची सर्वात मोठी प्राथमिकता आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध गाव पंचायतराज अभियानांतर्गत शिरपूर तालुक्यातील २३ ग्राम पंचायतींची खुलताबाद पंचायत समितीच्या मूल्यांकन समितीकडून तपासणी

छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) - मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत तालुकास्तरीय मूल्यमापन समिती खुलताबाद येथील गटविकास अधिकारी प्रकाश नाईक व त्यांच्या टीमने यांनी धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे भेट देऊन तालुक्यातील २३ ग्रामपंचायतींची तपासणी केली.

या समितीत गटविकास अधिकारी प्रकाश नाईक, गटशिक्षणाधिकारी श्रद्धा ताटे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शहनाज अन्सारी, कृषी विस्तार अधिकारी आर एफ पाटील, पत्रकार विजय चौधरी यांचा समावेश होता.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान शिरपूर तालुक्यात गटविकास अधिकारी प्रदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे राबविण्यात आले असून अभियानांतर्गत ग्रामपंचायतींनी केलेल्या कामांची तपासणी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद पंचायत समितीच्या मूल्यांकन समितीने शिरपूर तालुक्यातील तपासणी पूर्ण केली आहे. या अभियानांतर्गत शिरपूर तालुक्यातील २३ ग्रामपंचायतींनी सहभाग घेतला आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत केलेल्या कामांची तपासणी खुलताबाद पंचायत समि तीच्या पथकाकडून करण्यात आली. शिरपूर तालुक्यातील २३ ग्रामपंचायतीला भेट देऊन ग्रामपंचायतीची अभिलेखे तसेच अभियान काळात राबविण्यात आलेल्या विविध विकास कामांची तपासणी समितीने केली आहे.

या अभियानामुळे ग्रामीण विकासाला चालना मि ळाली असून गावाचा समृद्ध सर्वांगीण विकास साधण्यात मदत होणार आहे. तसेच तालुक्यातील सहभागी ग्राम पंचायत मध्ये विविध विकास कामांबाबत सकारात्मक स्पर्धा निर्माण झाली आहे. दरम्यान उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतीला तालुका, जिल्हा, विभाग, राज्यस्तरीय पुरस्कार दिले जाणार असल्याची माहिती प्रभारी गटविकास अधिकारी आर के गायकवाड यांनी दिली.

शिरपूर तालुक्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान शिरपूर तालुक्यातील २३ ग्रामपंचायतची तालुकास्तरीय समितीचे प्रमुख खुलताबाद पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रकाश नाईक व त्यांच्या टीम मधील इतर सदस्यांनी शिरपूर तालुक्यातील २३ ग्रामपंचायत मांडळ, अहिल्यापूर, बळभज, तरडी, खर्दे, खर्दे पाथर्डे, भटाणे, अर्थे बुद्रुक, जातोडा, उंटावद, खर्दे बुद्रुक, सुळे, ला हनुमान, रोहिणी, आंबे, कोराडी, नांदडे, वाठोडा, दुर्बळ्या, ताजपुरी, असली तांडे या ग्रामपंचायतची सखोल तपासणी करण्यात आली. त्यावेळी संबंधित ग्रामपंचायतने स्वयं मूल्यांकन पद्धतीने अपलोड करतेवेळी पडलेल्या गुणांची प्रत्यक्ष केलेल्या कामांची माहिती संबंधित समिती सदस्यांनी घेतली. ती पाहता त्यांनी शिरपूर तालुक्यातील २३ ग्रामपंचायत मध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान मधील प्रत्येक घटक मध्ये शासन परिपत्रकाप्रमाणे अभियानामध्ये आवश्यक सर्व बाबींवर अत्यंत प्रभावी कामकाज केली आहे, असे सांगितले. हे अभियान १७ सप्टेंबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राबविण्यात आले आहे. ग्रामपंचायतींनी गावातील मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला असून विविध विकास कामे लोकसभागातून श्रमदानातून अनेक विकास कामांना चालना मिळाली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान स्पर्धेसाठी सहभागी झालेल्या ग्रामपंचायतीची तपासणीसाठी आलेल्या मूल्यांकन समितीने आठ गावांना भेट देऊन ग्रामपंचायतचे सर्व रेकॉर्ड अभिलेखे तसेच अभियानातील सर्व निकषनिहाय केलेल्या कामांची पाहणी केली. गावातील नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी सुविधा, पाणी योजना, स्मशानभूमी, शाळा, अंगणवाडी, रस्ते, प्राथमिक उपकेंद्र, प्राथमिक केंद्र, जिम, व्यायाम शाळा, वृक्षारोपण, लोकसहभागातून श्रमदानातून केलेली विविध कामे इत्यादी कामांची प्रत्यक्ष पाहणी करून गावांचे कौतुक केल्याचे विस्तार अधिकारी ( पंचायत ) संजय पवार व जितेंद्र पावरा यांनी सांगितले.

# भटके विमुक्त विकास परिषद सदस्यांची राज्यपालांसोबत चर्चा



मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - भटके विमुक्त विकास परिषदेचे अध्यक्ष उद्धव काळे यांचेसह परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन, मुंबई येथे भेट घेऊन राज्यातील अतिमागास भटक्या विमुक्त समाजातील लोकांच्या विविध समस्यांबाबत चर्चा केली.

राज्यातील अतिमागास भटक्या विमुक्त समाजातील प्रतिनिधींना आपण लोकभवन येथे निमंत्रित करुन त्यांच्या समस्या जाणून घेऊ असे आश्वासन राज्यपालांनी शिष्टमंडळाला सांगितले. यावेळी शिष्टमंडळाने भटक्या विमुक्त समाजाच्या शिक्षण, आरोग्य, शासकीय नोंदीसंबंधी कागदपत्रे आदी प्रश्नांवर चर्चा केली.

परिषदेच्या सदस्यांनी राज्यपालांना यमगरवाडी, तालुका तुळजापूर, जिल्हा धाराशिव येथील एकलव्य विद्या संकुल येथे भेट देण्याचे निमंत्रण दिले.

तसेच दिनांक ३१ ऑगस्ट या विमुक्त दिनानिमित्त जातीचा दाखल, आधार कार्ड आदी कागदपत्रे वितरणाच्या कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. यावेळी भटके विमुक्त विकास परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ संजय पुरी, कार्यवाह नरसिंग झरे, कोषाध्यक्ष नरेश पोटे, विदर्भ संयोजक राजेंद्र दोनाडकर, प्रांत सहसंयोजक शरद म खर व राहुल चव्हाण आदी उपस्थित होते.

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक
श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

*जिल्हा रस्ता सुरक्षा समिती बैठक*

# ‘ब्लॅक स्पॉट’ निर्मूलनाचा कृती आराखडा तयार करा-जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील अपघात प्रवण स्थळांचे (ब्लॅक स्पॉट) स्थापत्य वा अन्य उपाययोजना करुन निर्मूलन करावयाचे आहे. त्यासाठी ज्या ज्या विभागांची जबाबदारी आहे, त्यानुसार कृती आराखडा तयार करा व काल बद्ध कार्यक्रम राबवून सर्व ब्लॅक स्पॉटचे निर्मूलन करा,असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज दिले.

जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अधीक्षक अभियंता एस.एस.भगत, प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे, कार्यकारी अभियंता श्रीमती प्रिया पुजारी, सहा. अधीक्षक अभियंता पूजा रावळे, सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी संदीप शेलार, पोल ीस निरीक्षक महामार्ग विभाग किशोर चौधरी, उप अभियंता यांत्रिकी जयराज उदे, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे प्रकल्प संचालक अमरिश मानकर, अभियंता अनिकेत कुलकर्णी, शिक्षणाधिकारी (माध्य.) आश्विनी लाठकर, पोलीस निरीक्षक वाहतुक आनंद झोटे, रोटरी क्लबच्या अध्यक्ष माधुरी सांगविकर, आदी मुख्यालयातून तर सेव्ह लाईफ फाऊंडेशन चे विशल वायकर, वैष्णवी कायाळकर आदी दुरदृष्यप्रणाल ीद्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गौडा यांनी सांगितले की, जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालयांमध्ये रस्ते सुरक्षा याविषयाबाबत जनजागृती करण्यासाठी संपूर्ण शैक्षणिक वर्षासाठी कालबद्ध कार्यक्रम तयार करा व त्या वेळापत्रकानुसार जिल्ह्याभरात जनजागृती करा. वाहन चालक-मालक यांच्यातही जनजागृती करा.जिल्हाधिकारी गौडा पुढे म्हणाले की, रस्त्यांवरचे सर्व गतिरोधक हे निकषांप्रमाणे असावे. जिल्ह्यातील अपघात प्रवण स्थळांबाबत स्थापत्य बदल, दिशा फलक, सुचना फलक, आवश्यक पट्टे मारणे इ. कामे करण्यासाठी संबंधित विभागांनुसार कामांचे वाटप करुन तात्काळ ही कामे पूर्ण करा. आवश्यकतेनुसार अत्याधुनिक कॅमेरे बसवा. वेगमापन यंत्रे बसवा. तसेच अपघातप्रवण स्थळांचे भौगोलिक अंकन स्थान माहिती सेवा पुरविणाऱ्या संस्थांना द्यावी व



अपघातप्रवण स्थळाबाबत वाहनचालकास आगाऊ सुचना मोबाईलद्वारे देण्याबाबत उपाययोजना करावी. तसेच रस्ते अपघातात जखमी झालेल्या व्यक्तिंना अपघात झाल्यापासून ते प्रत्यक्ष उपचार मिळण्याचा कालावधी हा कमीत कमी करण्याबाबतही उपाययोजना कराव्या. त्यासाठी १०८ क्रमांक रुग्णवाहिकांची व्यवस्था सुसज्ज असावी. याबाबत सर्व संबंधित विभागांनी संयुक्त उपाययोजना राबवाव्या. अपघात घडलेल्या ठिकाणाची पोलीस, परिवहन व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी करावी व कारणे शोधून त्यावर उपाययोजना सुचवावी,असेही निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी दिले.

# ९०० मिमी जलवाहिनी पूर्ण क्षमतेने सुरू करण्याचे निर्देश

## वीज पुरवठा खंडित होऊ नये यासाठी एमएसईबीशी समन्वय साधण्याच्या महापौरांच्या सूचना

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- शहरातील पाणीटंचाई कमी करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत उभारण्यात आल ेली ९०० मिलिमीटरची जल वाहिनी पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात यावी तसेच पाणी येण्याच्या वेळेत वीज पुरवठा खंडित होणार नाही यासाठी महावितरण (एमएसईबी) प्रशासनाशी समन्वय साधावा, असे निर्देश आज महापौर समीर राजूरकर यांनी दिले.





आज सकाळी साडेनऊ वाजता महापौरांच्या अध्यक्षतेखाली शहरातील पाणी वितरण व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये तसेच आयुक्त अमोल येडगे उपस्थित होते.

बैठकीत उपस्थित पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तयार केलेली ९०० मिमी जलवाहिनी पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यावर विशेष भर दिला. सद्यस्थितीत शहराला मिळणाऱ्या १५५ एमएलडी पाणीपुरवठ्यात या जलवाहिनी पूर्ण क्षमतेने सुरू केल्यावर किमान १७ एमएलडीची वाढ होणार असून त्यामुळे शहरातील पाण्याच्या तुटवड्यात मोठ्या प्रमाणात घट होण्यास मदत होणार आहे.

तसेच महापालिकेच्या पाणी वितरण विभागातील अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय ठेवून काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शहरातील प्रत्येक झोननिहाय पाणी वितरण व्यवस्थेचा स्वतंत्र चार्ट तयार करून सादर करावा, प्रत्येक उप अभियंता यांनी लाईनमन वर नियंत्रण ठेवावे असेही निर्देश देण्यात आले. तांत्रिक कारणांमुळे अथवा पाइपलाईन फुटल्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाल्यास तो पूर्ववत होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे, याची अचूक माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी नगरसेवकांना वेळेत द्यावी, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

ज्या भागांमध्ये फीडर लाईनमधून थेट नळ कनेक्शन घेण्यात आले आहे, त्या ठिकाणी आवश्यक त्या ठिकाणी क्रॉस कनेक्शन करून सर्व भागांना समान आणि नियमित पाणीपुरवठा मिळेल, यासाठी योग्य नियोजन करावे. याबाबतचा सविस्तर अहवाल पुढील आठवड्यात सादर करण्याचे निर्देश पदाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# उत्पादक विक्रेता परिषदेच्या पुर्वतयारीसाठी आज कार्यशाळा

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ ांच्या वतीने येथे दि. शनिवार दि.१६ व रविवार दि.१७ जून २०२६ रोजी उत्पादक विक्रेता परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून गुरुवार दि.१४ मे रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

सुक्ष्म व लघु उद्योगांसाठी निर्यात व्यवसाय संधी या विषयावर दि. १४ रोजी ही कार्यशाळा होणार आहे. ही कार्यशाळा ण्र्ईं कॉन्फरन्स हॉल येथे होणार आहे.

दिवसभर चालणाऱ्या या कार्यशाळेत पुढील विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे :

* निर्यातसाठी उद्योगांची तयारी आणि जागतिक खरेदीदारांसमोर प्रभावी सादरीकरण
* निर्यात वित्तपुरवठा, विमा आणि जोखीम व्यवस्थापन
* निर्यात दस्तऐवजीकरण आणि लॉजिस्टिक्स
* पॅकेजिंग, परवाने आणि गुणवत्ता प्रमाणपत्रे
* राज्य व केंद्र शासनाच्या निर्यात प्रोत्साहन योजना

कार्यशाळेचा तपशील : दि. १४ मे २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून CMIA कॉन्फरन्स हॉल, छत्रपती संभाजीनगर. इच्छुक सहभागी पुढील लिंकवर नोंदणी करू शकतात : https://forms.cloud.microsoft/r/hr5VEDLU2p?origin=lprLink अधिक माहितीसाठी मुकेश सामतानी किंवा अनिल सिंह रावत यांच्याशी संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

# उष्णतेच्या लाटेचा इशारा; नागरिकांना दक्षता घेण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- भारतीय हवामान विभागाच्या कुलाबा वेधशाळेने दिलेल्या इशाऱ्यानुसार जिल्ह्यात येत्या १५ तारखेपर्यंत उष्णतेच्या लाटेचा इशारा (येलो अलर्ट) देण्यात आला आहे.

त्यादृष्टीने उष्णता कालावधीत करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन नागरिकांना दक्षता घेण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जनार्दन विधाते यांनी केले आहे.

**काय करावे-**

१. पुरेसे पाणी प्या.तहान लागली नसली तरी दर अर्ध्यातासाने पाणी प्या.
२. घराबाहेर पडतांना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करा.
३. दुपारी १२ ते ३ दरम्यान घराबाहेर पडणे टाळा.
४. सुर्यप्रकाशापासून बचाव करण्यासाठी घरात पडदे,झडपांचा वापर करा.
५. उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडिओ, टिव्ही, वर्तमानपत्रातील माहितीचा वापर करा.
६. हलके, पातळ, सच्छिद्र सुती कपडे वापरा.
७. प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवा.
८. उन्हात काम करीत असल्यास टोपि, छत्री किंवा ओल्या कपड्याने डोके, मान , चहरा झाकावा.
९. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, घरी बनवण्यात आलेली लस्सी, कैरीचे पन्हे, लिंबु पाणीऊ, ताक इत्यादीचे नियमित सेवन करावे.
१०. अशक्तपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इ. उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे आहेत. अशी लक्षणे दिसल्यास व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.
११. घर थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करावा, रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्या.
१२.पंखे,ओलेकपडे याचा वापर करावा.थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे.
१३. कामाच्या ठिकाणी जवळ पिण्याच्या थंड पाण्याची व्यवस्था करावी.
१४.सुर्यप्रकाशाचा थेट संपर्क येणार नाही अशा ठिकाणी कामगारांनी थांबावे.
१५. पहाटेच्या वेळी जास्त कामाचा निपटारा करावा. बाहेर काम असल्यास अध्ये मध्ये विश्रांती घ्यावी.
१६. गरोदर स्त्रिया, आजारी व्यक्तिंची अधिक काळजी घ्यावी.
१७. गुरांचा छावणीत ठेवावे. त्यांना पुरेसे पाणी प्यावयास द्यावे.
१८. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या @ SDMAMaharashtra या ट्विटर, फेसबुक व कु ॲप वरील सुचना पहाव्या.
१९. जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या सुचना पहाव्या.

**(काय करू नये?)**

१. उन्हात अतिशय कष्टाची कामे करू नका.
२. दारू, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड-थंड पेये घेऊ नका.
३. दुपारी १२ ते ३ या वेळेदरम्यान घराबाहेर जाणे टाळा.
४. उच्च प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका.
५. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये.
६. गडद, घट्ट व जाड कपडे चालण्याचे टाळावे.
७. बाहेर तापमान जास्त असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत.
८. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे, तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराच्या खिडक्या उघड्या ठेवाव्या.

**कामगार व उद्योग क्षेत्रासाठी**

१. कामगारांचे कामाचे तास पुन्हा नियोजित करणे, विशेषतः दुपारच्या उष्णतेत काम टाळणे. २. आवश्यकतेनुसार कामाचा वेग कमी करण्याची परवानगी देणे. ३. पुरेसे पिण्याचे पाणी, विश्रांती क्षेत्रे व थंडावा मिळेल अशी व्यवस्था करणे. ४. आपत्कालीन बर्फ पॅक व उष्णता प्रतिबंधक साहित्य उपलब्ध करून देणे. ५. आरोग्य विभागाशी समन्वय साधून कामगारांचे नियमित आरोग्य तपासणी करणे.

**कारखाने व खाणी व्यवस्थापनासाठी**

१. कामगारांना सर्वाधिक उष्णतेच्या वेळेत विश्रांती देणे. २. दोन व्यक्तींच्या गटाने काम करण्याची व्यवस्था करणे. ३. इलेक्ट्रोलाइट पूरक पेय उपलब्ध करून देणे. ४. कामगारांना उष्णतेच्या धोका व उपाययोजनांबाबत जागरूक करणे.

**विशेष लक्ष देण्याचे गट**

१. बांधकाम कामगार, वीटभट्टी कामगार, रोजंदारी मजूर व असंघटित क्षेत्रातील कामगार. २. जनजागृतीसाठी पोस्टर, बॅनर व श्रमिक चौकांवर मोहीम आयोजित करणे.

**अतिरिक्त सूचना ग्रामयात्रा व सार्वजनिक कार्यक्रमांसाठी**

१. उन्हाळ्यात सुरू असलेल्या ग्रामयात्रा व धार्मिक / सांस्कृतिक मिरवणुका यामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून आवश्यक उपचार साहित्य व उपाययोजना उपलब्ध कराव्यात. २. प्रक्रिया व कार्यक्रमांचे वेळापत्रक उन्हाच्या उच्चांक काळात बदलण्याची शक्यता तपासावी. ३. प्रत्येक ठराविक लोकसंख्येच्या गटासाठी थंडावा मिळेल अशी विश्रांती क्षेत्रे अनिवार्यपणे उभारावीत. ४. यात्रांमध्ये पुरेसे पिण्याचे पाणी व इलेक्ट्रोलाइट पेय उपलब्ध करून द्यावे. ५. जनजागृतीसाठी स्थानिक पातळीवर घोषणाबाजी, पत्रके व माहिती फलकांचा वापर करावा.

सर्व नागरिकांनी उन्हाळ्यामध्ये उष्माघातापासून बचाव होण्याच्या दृष्टीने योग्य ती दक्षता घ्यावी व आपत्कालीन परिस्थितीत नजीकच्या शासकीय रुग्णालय / आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.

**मदत / संपर्क कक्ष**

जिल्हाधिकारी कार्यालयः-०२४०-२३३१०७७
जिल्हा रुग्णालय (जिल्हा शल्य चिकित्सक)- ०२४०-२९९४१५५
जिल्हा आरोग्य अधिकारी-९४२१८७७५६८
वैद्यकीय महाविद्यालय- GMCH – ०२४०-२४०२४०१ / CSMC – ८९५६३०६००७

# राज्यातील ९९ टक्के वीज ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज नाही

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- राज्यातील छतावरील सौरऊर्जा प्रकल्प बसविल ल्या सरसकट सर्व वीज ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज हा अधिभार द्यावा लागणार असल्याचे चित्र काही हितसंबंधी गटांकडून निर्माण केले जात असून ते पूर्णपणे चुकीचे आहे. राज्यामध्ये महावितरणचे एकूण ३ कोटी १७ लाख वीज ग्राहक असून त्यापैकी ४४,२४६ ग्राहकांना म्हणजे एकूण ग्राहकांपैकी एक टक्क्यापेक्षा कमी अर्थात केवळ ०.१४ टक्के वीज ग्राहकांना हा अधिभार लागू झाला आहे, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली.

ज्या ग्राहकांचा मंजूर भार १० किलोवॅटपेक्षा अधिक आहे व ज्यांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविला आहे त्यांना त्यांनी निर्माण केलेल्या विजेवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करावा, असा आदेश महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिला आहे. त्यानुसार महावितरणने संबंधित वीज ग्राहकांना हा अधिभार लागू केला आहे.

राज्यात महावितरणचे २ कोटी ३७ लाख घरगुती वीज ग्राहक आहेत. त्यापैकी ६ लाख ५७ हजार घरगुती वीज ग्राहकांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविले आहेत. आयोगाच्या आदेशानुसार सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या एकूण घरगुती ग्राहकांपैकी १६,४१० म्हणजे केवळ २.४९ टक्के घरगुती ग्राहकांनाच ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे. सर्व २ कोटी ३७ लाख ग्राहकांशी तुलना केली तर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेल्या घरगुती ग्राहकांचे प्रमाण केवळ ०.०७ टक्के आहे.

राज्यात एकूण ४ लाख ४५ हजार औद्योगिक (उच्चदाब व लघुदाब) वीज ग्राहक असून त्यापैकी केवळ ८,८९४ ग्राहकांना म्हणजे सुमारे २ टक्के ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेला आहे. त्याचप्रमाणे महावितरणच्या एकूण २३ लाख ३० हजार व्यावसायिक वीजग्राहकांपैकी १२,८३२ ग्राहकांना म्हणजे ०.५५ टक्के व्यावसायिक ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने २०१९ साली छतावरील सौरऊर्जा निर्मिती करणाऱ्या वीजग्राहकांवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करण्याचा निर्णय दिला होता. त्यावेळी आयोगाने छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्पांची राज्यातील एकूण क्षमता २ हजार मेगावॅट झाल्यावर हा चार्ज लागू करण्याचा आदेश दिला होता. आयोगाने २०२३ मध्ये ही मर्यादा ५ हजार मेगावॅट केली. या वर्षाच्या सुरुवातीला राज्याने ५ हजार मेगावॅटची क्षमता ओलांडल्यानंतर आयोगाने २५ मार्च २०२६ च्या वीजदर आदेशात ग्रीड सपोर्ट चार्ज निश्चित केला.

छतावरील सौरऊर्जा प्रकल्प बसविलेले जे ग्राहक अतिरिक्त वीज महावितरणला देतात त्यांना त्याबद्दल लाभ मिळतो. राज्यातील ४ ल ाख ९० हजार वीजग्राहकांना या प्रकारे गेल्या वर्षभरात १२९ कोटी ५७ लाख रुपयांचा लाभ मिळाला आहे. त्यामध्ये ४ लाख ७२ हजार घरगुती ग्राहकांचा समावेश आहे व त्यांना १२४ कोटी ५५ लाख रुपयांचा लाभ झाला आहे.

# राजकीय पक्षांनी आपले मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी नेमावे- जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमासाठी मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी आपले मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी नेमणूक करावी. त्याची माहिती मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडे द्यावी,असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज केले.

मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांच्या अनुषंगाने आज राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक बोलावण्यात आली होती. उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती सविता चौधर व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गौडा म्हणाले की, निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, मतदार यादी अचूक व पारदर्शक असण्याच्या दृष्टीने सर्व राजकीय पक्षांचा सहभाग असणे आवश्यक आहे. मतदार यादीचे पुनरिक्षण ही प्रक्रिया वर्षातून एकदा होत असली तरी मतदार यादी अद्यावत करणे ही निरंतर प्रक्रिय निरंतर असते.त्यासाठी प्रत्येक यादी भागासाठी मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी राजकीय पक्षांनी नेमावे. जेणे करुन मतदार यादीच्या पारदर्शकतेबाबत राजकीय पक्षांना अधिक माहिती मिळू शकेल. तरी सर्व राजकीय पक्षांनी आपले प्रतिनिधींची नावे द्यावी. हे प्रतिनिधी कोणत्याही शासकीय वा शासकीय अनुदानित संस्थेशी संबंधित नसावे. ते त्याच भागातील रहिवासी असावे, त्यांचे नाव त्याच मतदार यादीत असावे,असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाबाबत सादरीकरण करण्यात आले व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना त्याबाबत माहिती देण्यात आली. राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या शंकांचे निरसनही जिल्हाधिकारी गौडा यांनी केले.

# एमआयएम नगरसेवकाच्या घर-कार्यालयावर बुलडोझर





छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगरमध्ये एआयएमआयएम नगरसेवक मतीन पटेल यांचे घर आणि कार्यालय बुधवारी सकाळी बुल डोझरने पाडण्यात आले. ही कारवाई महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामाच्या प्रकरणात केली आहे. पोलिसांनुसार, आरोपी निदा खानला ७ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथून अटक करण्यात आली होती. मतीन पटेलने तिला आपल्या घरात आश्रय दिला होता असा दावा करण्यात आला. यानंतर ९ मे रोजी महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामाबाबत नोटीस बजावली होती आणि ७२ तासांत उत्तर मागितले होते. दरम्यान, या प्रकरणावर महाराष्ट्राचे मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, एकीकडे पटेल आणि त्यांचे लोक घर आपले नसल्याचे सांगत होते, तर दुसरीकडे महानगरपालिकेच्या नोटिशीविरोधात न्यायालयात जाण्याची भाषा करत होते. हे दुहेरी मापदंड आहे. निदा खान केवळ एक ’पेड वर्कर’ होती. या धर्मांतर रॅकेटमध्ये एखाद्या राजकीय पक्षाची भूमिका असू शकते.

# सावंगी येथील स्टेपिंग स्टोन हायस्कुल शाळेची मान्यता अखेर रद्द

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- राज एज्युकेशन ॲण्ड ट्रस्ट मैमुनव्हीला पानचक्की रोड संचलित असलेल्या सावंगी येथील स्टेपिंग स्टोन हायस्कुल या शाळेची मान्यता शिक्षण विभागाने रद्द केली होती. यावर शाळेच्या संस्थेने शिक्षणसंचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक पुणे यांच्याकडे अपिल केले होते. या अपिलात सुनावणीअंती विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षण विभाग यांनी दिलेला निर्णय पाहता शाळेची मान्यता रद्द करण्याचा निर्णय एका सुनावणीत घेण्यात आला.

२१ एप्रिल २०२६ रोजी शिक्षण संचालक पुणे यांच्या दालनात सुनावणी घेण्यात आली. यामध्ये २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सदर शाळेची मान्यता रद्द केल्याचे नमुद झाले. याच अनुषंगाने जिल्हा परिषद माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी आश्विनी लाटकर यांनी पंचायत समिती छत्रपती संभाजीनगर येथील गटशिक्षण अधिकाऱ्यांना पत्राद्वारे कळवून मान्यता रद्द केलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे इतरत्र शाळेत समायोजन केले जावे अशा प्रकारच्या सुचना केल्या आहेत.

(पान १ वरुन)

## नरेंद्र मोदींचा कृतीतून संदेश!,...

वाहनांची संख्या कमी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही त्यांच्या ताफ्याचा आकार निम्म्याहून अधिक कमी केला आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनीही आपल्या अधिकृत ताफ्यातील वाहनांची संख्या ५० टक्क्यांनी कमी करण्याचा आणि महाराष्ट्र दौऱ्यादरम्यान बसने प्रवास करण्याचा निर्णय घेतला आहे.

## किशोरी पेडणेकरांनी १००...

कालिदास संकुल व पश्चिम उपनगरातील लोकांसाठी शहाजीराजे संकुल होते. येथे कला, क्रीडा, नाट्य, ललितकला अकादमी यांच्या विकासासाठी ही संकुले उभी करण्यात आले.

पण २०२१ मध्ये उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना किशोरी पेडणेकर यांच्या महापौरपदाच्या काळात त्यांनी कोणतेही अधिकार नसताना व कायद्यात तरतूद नसताना १५ वर्षांसाठी दोन्ही ठिकाणची सगळी सुमारे २० एकर ९ लाख चौरस फूट जागा या दोन डेकोरेटर्सना दिल्या. हे केवळ बेकायदाच नव्हे तर त्यांनी डेकोरेटर्सचा तब्बल १०० कोटींचा फायदा करून दिला. याविषयी मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्याशी चर्चा केली आहे. या प्रकरणात सहभागी असणाऱ्या नगरसेवकांवर कारवाई झाली पाहिजे.

किरीट सोमय्या यांनी यावेळी छत्रपती संभाजीनगर येथील एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांच्या घरावर करण्यात आलेल्या बुलडोझर कारवाईचेही जोरदार समर्थन केले. एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल हा कॉर्पोरेट जिहादचा मुख्य आरोपी आहे. त्याचे अनधिकृत घर तोडण्याचे काम महापालिकेच्या ज्या अधिकाऱ्यांनी केले त्यांना मी धन्यवाद देतो. एमआयएमचे नेते चोराच्या उलट्या बोंबा आहेत. ते या प्रकरणी टीका करत आहेत. पण या सगळ्या बेईमान लोकांनी डझनभर हिंदू तरुणींचे आयुष्य उद्धवस्त केले. त्या लोकांनाही तोडायला पाहिजे. ते २० वर्ष बाहेर येणार नाहीत, याची काळजी आम्ही घेऊ, असे ते म्हणाले.

## भोंदू खरातशी संबंध नाही...

आपले थेट संबंध नव्हते, त्यांना केवळ आध्यामिक गुरू मानत होते, असे सांगून रुपाली चाकणकर यांनी हात झटकण्याचा प्रयत्न केला. परंतु खरात याची दीड महिना चौकशी करून एसआयटीने चाकणकर यांनाही चौकशीसाठी पाचारण केल्याने त्यांच्यासाठी हा मोठा धक्का होता. आता खरातसोबतच्या गुवाहाटी दौऱ्याने त्यांचा पाय अधिक खोलात गेला आहे.


## श्रीराम फायनान्स लिमिटेड

SHRIRAM Finance
SHRIRAM City — MONEY WHEN YOU NEED IT MOST

**मुख्य कार्यालय:** लेव्हल–३, वोक्खार्ड टॉवर्स, इस्ट विंग, सी–२ ब्लॉक , वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई–४०००५१.
**दूरध्वनी:** ०२२–४२४१०४००, ०२२–४०६०३१००, **वेबसाईट:** www.shriramfinance.in
**नोंदणीकृत कार्यालय:** श्री टॉवर्स, प्लॉट नं.१४ए, साउथ फेज, इंडस्ट्रीयल इस्टेट, गुइंडी, चेन्नई – ६०० ०३२
**शाखा कार्यालय:** सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, इमारत क्रमांक १०, १०६२,सहावा मजला,गुरु हरगोविंदजी मार्ग, चकाला अंधेरी पूर्व मुंबई -४०००९३

**परिशिष्ट ४- ए** [नियम ८(५डी) ८(८) आणि ९ मधील तरतूद पहा] **स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**टीप: या द्वारे सूचित करण्यात येते कि एनसीएलटी , चेन्नई यांच्या आदेशानुसार “श्रीराम सिटी युनियन फायनान्स लिमिटेड” चे “श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स लिमिटेड” मध्ये एकत्रीकरण करण्यात आले आहे, त्यानंतर नाव बदलाच्या अनुषांगाने ३०. ११. २०२२ दिनांकीत निगमन प्रमाणपत्रा अनन्वे दिनांक ३०. ११. २०२२ रोजी पासून "श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स लिमिटेड" चे नाव बदलून ते "श्रीराम फायनान्स लिमिटेड" असे करण्यात आले आहे.**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ८(५डी) ८(८) आणि ९ तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार व जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की, श्रीराम फायनान्स लिमिटेडकडे गहाण/प्रभारी असलेली खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, जिचा प्रत्यक्ष ताबा श्रीराम फायनान्स लिमिटेडच्या (पूर्वीचे नाव श्रीराम सिटी युनियन फायनान्स लिमिटेड) अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, ती मालमत्ता, तक्त्यात नमूद केलेल्या कर्जदार व जामीनदारांकडून श्रीराम फायनान्स लिमिटेडला देय असलेली उर्वरित रक्कम वसूल करण्यासाठी, खाजगी कराराद्वारे ‘जशी आहे तशी’, ‘जे काही आहे ते’ आणि ‘जे काही असेल ते’ या तत्त्वावर रु. १,७०,००,०००/- ला विकली जाईल. कर्जदार व जामीनदारांचा तपशील, देय रक्कम, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि त्यावरील ज्ञात बोजा, ताब्याचा प्रकार, राखीव किंमत आणि बयाणा रक्कम व वाढीव रक्कम खालीलप्रमाणे दिली आहे:

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवणाऱ्यांचे नाव | तारीख व रक्कम १३(२) डिमांड सूचनेनुसार | निश्चित खाजगी करार रक्कम | ठेव ठेवण्यासंबंधी तपशील खाजगी कराररक्कम | संपर्क व्यक्ती आणि तपासणीची तारीख |
|---|---|---|---|---|
| **१) नर्मदा इंडसट्रीएस प्रो.राजेंद्र छगन पराशर २) नर्मदा एंटरप्राइजेस, ३) शिवम एंटरप्राइजेस, ४) राजेंद्र छगन पराशर, ५) संगीता राजेश पराशर,** <br> **ताबा दिनांक व ताबा प्रकार** <br> **१६/१२/२४- प्रत्यक्ष ताबा** <br> **ज्ञात अधिभार** ज्ञात नाही | मागणी सूचना दिनांक : ०९-०५-२०२४ दिनांक ०९-०५-२०२४ रोजी कर्ज खाते क्र. CDAURTF2112280001 आणि CDAURTF2107040001 अंतर्गत रुपये रु. १८७४३५८८/- आणि रु. १०१७७८७/- एकूण रक्कम रु. १९७६१३७५/- (फक्त एक कोटी सत्त्याण्णव लाख एकसष्ट हजार तीनशे पंच्याहत्तर रुपये) करारानुसार दराने पुढील व्याजासह, तसेच अनुषंगिक खर्च, किंमत, आकारणी | **रु. १,७०,००,०००/-** | खाजगी करार रक्कम खाली नमूद केलेल्या खात्याच्या तपशिलानुसार आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात श्रीराम फायनान्स लिमिटेडच्या बाजूने जमा करावी: **बँकेचे नाव-** ॲक्सिस बँक लिमिटेड **शाखा:** डॉ. राधाकृष्णन सलई मायलापोर, चेन्नई **बँक खाते क्रमांक-** चालू खाते क्रमांक ००६०१०२०००६७४४९ **आयएफएससी कोड-** यूटीआयबी 0000006 | **सुहास ओहळ ९६९९९०५२२२** <br> **पंकज परदेशी ९८२३२७७७८९** |

**संपत्तीचे विवरण**

१) भूखंड क्रमांक एफपी-४९, क्षेत्रफळ २००० चौ.मी., शेंद्रा फाईव्ह स्टार औद्योगिक क्षेत्र, कुंभेफळ, औरंगाबाद, याच्या सीमा खालीलप्रमाणे: पूर्व: एमआयडीसी रस्ता (२०.०० मी.) पश्चिम: भूखंड क्रमांक एफपी-४ दक्षिण: एमआयडीसी रस्ता (२०.०० मी.) उत्तर: भूखंड क्रमांक एफपी-५०. २) भूखंड क्रमांक एफपी-५०, क्षेत्रफळ २००० चौ.मी., शेंद्रा फाईव्ह स्टार औद्योगिक क्षेत्र, कुंभेफळ, औरंगाबाद, याच्या सीमा खालीलप्रमाणे: पूर्व: २०.०० मी. रस्ता पश्चिम: भूखंड क्रमांक एफपी-४७ दक्षिण: भूखंड क्रमांक एफपी-४९ उत्तर: भूखंड क्रमांक एफपी-५१

**[नियम 8(5d) 8(8) आणि 9 मधील तरतूद पहा]**
**खाजगी कराराअंतर्गत या विक्रीबाबत कोणताही आक्षेप १५ दिवसांच्या आत घेतला जाऊ शकतो.**
**कर्जदार/गहाणदार/जामीनदारांना याद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी वर नमूद केलेली रक्कम अद्ययावत व्याज आणि अनुषंगिक खर्चासह भरावी, अन्यथा मालमत्ता वर नमूद केलेल्या रकमेसाठी खाजगी करारामार्फत विकली जाईल आणि कोणतीही थकबाकी असल्यास, ती व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल.**

**ठिकाण : औरंगाबाद**
**दिनांक : १४-०५-२०२६**

**स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी**
**श्रीराम फायनान्स लिमिटेड**